| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ५ वा | सोमवार, दिनांक १६ मार्च २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## एलपीजी घेवून ९२,७०० टन गॅस भारतात दाखल होणार



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : 'शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'ची दोन मोठी एलपीजी वाहक टँकर जहाजे- 'शवालिक' आणि 'नंदादेवी'- इराणच्या किनारपट्टीवरील धोकादायक 'होर्मुझची सामुद्रधुनी' यशस्वीरित्या ओलांडून भारताच्या वेशीवर आली आहेत. एल पी जी घेऊन सोमवारी पहिला टँकर 'शिवालिक', तर मंगळवारी 'नंदादेवी' येणार! ९२,७०० टन गॅस यामध्ये असणार आहे.**

पश्चिम आशियातील युद्धामुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर निर्माण झालेले संकट काही अंशी कमी झाले आहे. 'शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'ची दोन मोठी एलपीजी वाहक टँकर जहाजे- 'शिवालिक' आणि 'नंदादेवी'- इराणच्या किनारपट्टीवरील धोकादायक 'होर्मुझची सामुद्रधुनी' यशस्वीरित्या ओलांडून भारताच्या वेशीवर आली आहेत. सोमवारी उशीरा शिवालिक भारतीय बंदरावर पोहोचणार असून मंगळवारी नंदादेवी टँकर पोहोचणार आहे. हा गॅस भारताला किती दिवस पुरणार असा सवाल उपस्थित होत आहे.

या दोन जहाजांवर मिळून सुमारे ९२,७०० मेट्रिक टन एलपीजी गॅस आहे. प्रत्येक जहाजावर ४६,००० टनांहून अधिक गॅस असून, तो देशाच्या घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. शिवालिक हे जहाज १६ मार्च २०२६ रोजी सोमवारी गुजरातच्या मुंद्रा बंदरात पोहोचण्याची शक्यता आहे. नंदादेवी हे जहाज १७ मार्च २०२६ रोजी कांडला बंदरात दाखल होईल.

भारताच्या एकूण गॅस आयातीपैकी ९०% आयात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होते. तज्ज्ञांच्या मते, भारतामध्ये दररोज सुमारे ८०,००० टन एलपीजीचा वापर होतो. दररोज सुमारे ७५ लाख सिलेंडर वापरले जातात. एकूण गॅसपैकी ८५% सिलेंडर स्वयंपाकासाठी (घरगुती) वापरले जातात. भारतात ३३ कोटी एलपीजी ग्राहक आहेत. या ९२,७०० टन गॅसमुळे देशातील सुमारे सव्वा दिवसाची अतिरिक्त गरज पूर्ण होऊ शकते. युद्धाच्या काळात जेव्हा पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे, तेव्हा हा सव्वा दिवसाचा साठाही भारतीय स्वयंपाकघरांसाठी मोठा दिलासा मानला जात आहे.

'शिवालिक' आणि 'नंदादेवी' ही दोन जहाजे सुरक्षित बाहेर पडल्यानंतर, आता होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पश्चिमेला अडकलेले ६ एलपीजी आणि १ एलएनजी टँकर भारतात आणण्यासाठी हालचाली वेगवान झाल्या आहेत. होर्मुझच्या पाण्यावर सध्या भारताची २२ जहाजे उभी असून त्यावर ६११ भारतीय खलाशी आहेत. भारत प्रामुख्याने कतार, कुवेत आणि सौदी अरेबियाकडून गॅस आयात करतो. हे गॅस टँकर्स सध्या इराणच्या लष्करी देखरेखीखाली असलेल्या भागात आहेत. परंतू, ते भारताचे आहेत म्हणून इराणने सोडण्याची परवानगी दिली आहे.

**भारताचे कूटनीतिक प्रयत्न**

भारत सरकार आणि इराणमध्ये सध्या उच्चस्तरीय चर्चा सुरू आहे. जर हे ६ टँकर्स सुरक्षितपणे भारताच्या दिशेने निघाले, तर देशातील गॅस साठ्यात मोठी वाढ होईल आणि युद्धाच्या काळात निर्माण झालेली टंचाईची भीती दूर होईल. भारताने 'युआन'मध्ये पेमेंट स्वीकारण्याबाबत अद्याप अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही, परंतु जहाजांच्या सुरक्षिततेसाठी मध्यस्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

**पॅनिक बुकिंग टाळण्याचे आवाहन**

पेट्रोलियम मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, देशात पुरेसा गॅस साठा उपलब्ध आहे. नागरिकांनी घाबरून 'पॅनिक बुकिंग' करू नये आणि केवळ आवश्यक असेल तरच सिलिंडर बुक करावा, असे आवाहन सहसचिव सुजाता शर्मा यांनी केले आहे. काळाबाजार रोखण्यासाठी अनेक राज्यांमध्ये छापेमारीही सुरू करण्यात आली आहे.

## रेणापूर तालुक्यात केंद्रप्रमुख परीक्षा उत्तीर्ण शिक्षकांचा सत्कार



**रेणापूर/प्रतिनिधी :** पंचायत समिती रेणापूरचे गटशिक्षणाधिकारी श्री. कृष्णा भराडिया साहेब व रेणापूर पतसंस्थेचे चेअरमन गोपाळरावजी पडिले सर यांच्या अध्यक्षतेखाली हॉटेल गंधर्व येथे केंद्रप्रमुख परीक्षा उत्तीर्ण शिक्षकांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.

या परीक्षेत रेणापूर तालुक्यातील श्री. विलास यादव यांनी महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक मिळवला, तर श्री. उमाकांत कोंपले यांनी लातूर जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. या दोघांचा विशेष सत्कार करण्यात आला.

तसेच विजय माळी, महादेव डाके, दत्ता यादव, बालाजी जोगदंड, प्रेम दुड्डे, पांडू चव्हाण, अजय शिरसाठ आणि रवी मद्देवाड यांनीही केंद्रप्रमुख परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला जीएसटी विभागाचे माजी कमिशनर डॉ. निळकंठ डाके, अंकुशराव डाके आणि माजी सरपंच सुधाकरराव शिनगारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जयपाल फड यांनी केले तर आभार प्रदर्शन विठ्ठल कुरमुडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अविनाश डाके, हंसराज मुदामे आणि गोविंद कांदे यांनी परिश्रम घेतले.

## निलंग्यात गॅस दरवाढ विरोधात कॉंग्रेसचे आंदोलन




**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र सरकारकडून वारंवार घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत वाढ करण्यात येत असून यामुळे सर्वसामान्य नागरिकांना जीवन जगणे अत्यंत कठीण झाले आहे. आधीच महागाईच्या वाढत्या ओझ्याखाली सामान्य नागरिक, महिला व कुटुंबचे-कुटुंब त्रस्त असताना गैस दरवाढ ही त्यांच्यावर आणखी एक आर्थिक भार ठरत आहे. गॅस दरवाढ तात्काळ मागे घ्यावी या मागणीसाठी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या सूचनेनुसार निलंगा तहसील कार्यालयासमोर कॉंग्रेसच्या वतीने आंदोलन करुन निवेदन देण्यात आले.

निवेदनात सध्या बाजारपेठेत एलपीजी गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना वेळेवर गॅस सिलेंडर उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीमुळे सर्वसामान्य जनतेत तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

त्यामुळे केंद्र सरकारकडे तात्काळ घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, बाजारपेठेत निर्माण झालेला सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा तातडीने दूर करावा, सर्वसामान्य नागरिकांना सिलेंडर सहज व नियमित उपलब्ध होईल यासाठी योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील, शहराध्यक्ष तथा नगरसेवक अजित नाईकवाडे, नगरसेवक डॉ गजेंद्र तरंगे, सिराज देशमुख, जि.प. सदस्य शाहीद पटेल, प्रमोद मरुरे, प.स.सदस्य किरण पाटील, अभिजित उसनाळे, बालाजी गोमसाळे, माधवराव पाटील, विठ्ठल पाटील, अजगर अन्सारी, महेश देशमुख, प्रशांत वांजरवाडे, राजप्पा वारद, तुषार सोमवंशी, महेश भोसले,बालाजी सूर्यवंशी व गणेश पेठकर आदी उपस्थित होते.

## आदिशक्ती अभियान अंतर्गत आनंदवाडी ग्रामपंचायतीची तपासणी

**नळेगाव/अजगर मजकुरी :** आदिशक्ती अभियान अंतर्गत जिल्हा समितीकडून आनंदवाडी ग्रामपंचायती तपासणी....आज दिनांक १४/०३/२०२६ वार.. शनिवार रोजी आदिशक्ती अभियान अंतर्गत शिरूर अनंतपाळ तालुक्यातील आनंदवाडी ग्रामपंचायतीची जिल्हा समितीकडून तपासणी करण्यात आली. आदिशक्ती अभियान तपासणीसाठी जिल्हा स्तरीय समितीने शिरूर अनंतपाळ तालुक्यातील आनंदवाडी ग्रामपंचायत ही शिरूर अनंतपाळ तालुक्यात प्रथम क्रमांकावर आली असून जिल्हा स्तरावर टॉप ग्रामपंचायत मध्ये आली असून या ग्रामपंचायतची जिल्हा समिती मार्फत तपासणी करून पाहणी केली . व समितीचे प्रमुख उपमुख्य कार्यकारी मा. जावेद शेख साहेब अधिकारी यांच्या हस्ते गावातील प्रत्येक कुटुंबातील महिलांना कचरा व्यवस्थापनसाठी कचरा कुंडी देण्यात आली. समितीतील मा. श्री. जावेदजी शेख सर (उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला बा.जि. प. लातूर), या. श्री घुगे साहेब (ना. तहसीलदार लातूर), मा. श्री. कानडे साहेब (सहाय्यक गटविकास अधिकारी जि.प.लातूर) मा. श्री. पाटील साहेब (सहाय्यक प्रकल्प अधिकारी लातूर), मा.श्री.जाधव साहेब (तालुका आरोग्य अधिकारी लातूर), मा. श्री. बोंबले साहेब (विस्तार अधिकारी जिल्हा प.लातूर),मा. श्री. निकम साहेब विस्तार अधिकारी सा.शिरूर अ., मा.खलंग्रे मॅडम (अंगणवाडी पर्यवेक्षिका शि. अ.),मा.श्री चपटे साहेब (बाल संरक्षण समिती), मा. श्री राहुल शिरूरे कनिष्ठ सहाय्यक खउऊ्ड शि. अ. आनंदवाडीचे सरपंच भागवत वंगे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बालाजी शिंदे सर, ह.भ.प. धोंडीराम आण्णा कोल्हे, उपसरपंच व्यंकट कल्ले, आशा वर्कर अनूसया पेद्देवाड, अंगणवाडी सेविका अश्विनी मरे, ग्रामपंचायत ऑपरेटर लक्ष्मण नाटकरे, सेवक रंजित मरे, उठझ अनूसया शिरूरे , सुवर्णा आर्धे, अंजली सोनवणे, शांताबाई शिरूरे आदी गावातील नागरिक महिला उपस्थित होते.

## क्राईम न्यूज

### करजखेडा येथे भरधाव जीपची दोन कारला धडक : भीषण अपघातात एक ठार, दोन गंभीर



**औसा/प्रतिनिधी :** तुळजापूर तालुक्यातील करजखेडा चौरस्ता येथील उड्डान पुलावर दोन कार व एका जीपचा भिषण अपघात झाला. यामध्ये औसा तालुक्यातील आलमला येथील एकजण जागीच ठार झाला तर अन्य दोघे गंभीर जखमी झाले. हा अपघात रविवारी दुपारी घडली असून याप्रकरणी जीप चालकावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

तुळजापूरकडून औसा शहराकडे कार जात होती. कारला त्याच दिशेने जात असलेल्या जीपने जोरदार धडक दिली. यामुळे कार उलटून पडली. यामध्ये काही प्रवासी किरकोळ जखमी झाले. यानंतर जीप वेगात असल्यामुळे ती रस्ता दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेला गेली. त्यावेळी तुळजापूरच्या दिशेने जाणाऱ्या औसा तालुक्यातील कारला जीपने धडक दिली. यामुळे ही कारही उलटली. यामधून प्रवास करणारे जीवन बसवंतराव पाटील (६७, रा. आलमला, ता. औसा) जागीच ठार झाले. तसेच याच कारमधील नित्यानंद मोहन बुके (३५), मोहन बुके (६५) गंभीर जखमी झाले आहेत. अर्जुन पडुळे (३५) व चेतन बुके (३०, चौघे रा. आदर्श कॉलणी, लातूर )यांनाही मोठी दुखापत झाली आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहिती नुसार जीपने दुभाजक ओलांडत असताना झाडेही उध्वस्त केली. जीपचा चालक मद्यधुंद अवस्थेत जीप चालवत होता. बेंबळी (ता. धाराशिव) पोलिस ठाण्यात समजल्यानंतर जीप चालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

**जोराचा आवाज, किंकाळ्यांनी परिसर हादरला**

अपघात झालेल्या उड्डानपुलाच्या खालीच मी वरात पाहत थांबलो होतो. तेव्हा अचानक मोठा आवाज झाला. सुरुवातीला आवाज कोठून आला समजलेच नाही. नंतर पुलावरच गोंधळ सुरू होता. मी पळतच पुलावर गेलो तेव्हा दोन कार व जीपचा अपघात झाल्याचे दिसून आले. एका कारमध्ये अत्यंत दयनिय अवस्था होती. एकजण जागीच ठार झाला होता. दुसरे जखमी जोरात ओरडत होते. त्यांना दगडाने पत्रा फाडून व काच फोडून बाहेर काढले. पोलिस व रुग्णवाहिकेला फोन केला. मात्र, जखमींची अवस्था गंभीर असल्यामुळे मालवाहू पिकअपमधून त्यांना तुळजापूरला पाठवले. सुधीर भोसले, सरपंच,करजखेडा

**लातूरहुन सोलापूर कडे जात होते बुके कुटुंबीय**

काही खाजगी कामानिमित्त मोहन बुके व त्यांचे कुटुंबीय आणि आलमला येथील त्यांचे मावस बंधू कारने जात असताना अचानक विरुद्ध दिशेने आलेल्या वेगवान जीपने कारला जोराची धडक दिली. यात कारमधील आलमला येथील जीवन पाटील यांच्या जागीच मृत्यू झाला.

**शोकाकुल वातावरणात आलमला येथे अंत्यसंस्कार**

जीवन पाटील हे औसा तालुक्यातील आलमला येथील एक व्यापारी होते. मुख्य चौकातच त्याचे स्टेशनरी दुकान होते. त्याच्या अपघाती निधनाची बातमी समजताच संपूर्ण गावावर शोककळा पसरली. त्याच्यावर रात्री ९ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई,पत्नी, भाऊ, भाऊजया, मुलगा, सून, मुलगी असा मोठा परिवार आहे.

### स्विफ्ट कारच्या धडकेमुळे मोटारसायकलवरील पिता पुत्र ठार, कारचालक पसार!





**जळकोट/प्रतिनिधी :** शिरुर ताजबंद - मुखेड राज्य महामार्गावरील उमरगा रेतू पाटी ( ता. जळकोट) येथे स्विफ्ट डिझायर कारने धडक दिल्याने ग्राम पंचायत उमरगा रेतू येथील उपसरपंच व शेतकरी अंकुश विश्वनाथ गित्ते वय ५८ वर्षे व त्यांचा पुत्र ओमकार अंकुश गित्ते वय २५ वर्षे हे पिता पुत्र ठार झाले आहेत. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना अहमदपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून मिळाली आहे.

उपसरपंच अंकुश गित्ते व त्यांचा पुत्र ओमकार गित्ते हे राज्य महामार्गावरील शेताकडून मोटारसायकवरने आपल्या घराकडे निघाले होते. त्यावेळी जांबकडून हडोळतीकडे येणाऱ्या भरधाव वेगात असलेल्या एम एच २४ बी एच २२९४ या डिझायर कारने त्यांच्या मोटारसायकला जोरदार धडक दिली. या धडकेने हे पिता पुत्र गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने अहमदपूर येथील रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र तेथे त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

### किनगावात युवकावर चाकूहल्ला; ६ जणांवर गुन्हा

**किनगांव/प्रतिनिधी :** किनगाव : अहमदपूर तालुक्यातील किनगाव येथील बस स्थानक परिसरात युवकावर चाकू हल्ला झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना गुरुवारी (दि.१२) दुपारी सव्वा दोनच्या सुमारास घडली. हल्ल्यात युवक गंभीर जखमी झाला असून घटनेमुळे व्यापारी वर्गात घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. रोहीत महादेव दहीफळे (वय २३ ) असे जखमी युवकाचे नाव आहे.

चिखली येथील रोहीत दहीफळे याला गुरुवारी दुपारी किनगाव येथील बस स्थानक परिसरात असलेल्या स्विट होम समोर हल्लेखोरांनी बोलावून घेतले. त्यानंतर वाद घालत त्याच्यावर चाकू हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले. जखमी युवकावर अंबेजोगाई येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. फिर्यादी रोहित दहिफळे यांच्या फिर्यादीवरून आरोपी ऋषिकेश घुले (रा. मोळवण हंगामी किनगाव याच्यासह आणखी ५ जणांवर शुक्रवारी सायंकाळी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींच्या शोधासाठी २ तपास पथके रवाना करण्यात आली आहेत. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले,सपोनी माणिक डोके,उपनिरीक्षक सत्यजित तोंडारे,वलमपल्ले यांनी भेट देऊन पाहणी केली. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक माणिक डोके करीत आहेत.

**रोज वाचा ऑनलाईन लातूर समाचार**
www.latursamachar.com

### प्रभात किरणे

ज्ञान डोक्यात,धन कपाटात
न देता कोणा,जाते सडून न
घेता उपभोग,काय उपयोग
काय घडे येथे,जाता सोडून
-इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९१-९७६४७ ८८२८८

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



मराठवाडा आणि विदर्भातच्या काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज...

### चिमटा दयाचा



आपघाताच्या प्रमाणात
वाढ झाली आहे!
अविचाराने गाड्या
चालविल्या जात आहेत!!
त्यामुळे प्राणहानी
वाढली आहे!!!

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

## लातूर समाचार

### विचार करून नियम बनवावेत

शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाच्या धोरणाच्या नियमावलीनुसार विद्यार्थांच्या घराजवळचे १ किलोमीटर अंतरातील शाळाच विद्यार्थ्यांना निवडता येईल, ही नवी तरतूद शिक्षण हक्क कायद्याच्या मूळ तत्त्वालाच हरताळ फासणारी आहे. ही तरतूद म्हणजे शिक्षण हक्क कायदा रद्द करण्याचे धोरण आहे. त्याचप्रमाणे श्रीमंत शाळांच्या दबावाला राज्य शासन बळी पडले आहे, असे वाटते. आपल्या राज्यघटनेतील बंधुत्वाचे उद्दिष्ट तेव्हाच साध्य होऊ शकते जेव्हा एखादा गरीब विद्यार्थी करोडपती किंवा मुख्यमंत्र्याच्या विद्यार्थ्याच्या शेजारी बसून शिक्षण घेतो. जेव्हा दोघे शाळेत/महाविद्यालयात एकत्र खेळतात तेव्हा हे साध्य होऊ शकते. शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाची तरतूद सामाजिक विषमता संपवण्यासाठी आणि सामाजिक समरसता निर्माण करण्यासाठी एक ध्येय म्हणून राबवली पाहिजे, असे प्रतिपादन उपरोक्त शब्दांत नुकतेच सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींनी व्यक्त केले. त्यानंतर महाराष्ट्रात शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाच्या धोरणाबाबत नवी नियमावली नुकतीच जाहीर करण्यात आली, हा एक दुर्दैवी योगायोग आहे. राज्यातील ८६५० स्वयंअर्थसहाय्यित व विनाअनुदानित खासगी शाळांमध्ये एकूण १ लाख १२ हजार ७०६ जागांसाठी ही नियमावली वादात सापडली आहे. या तरतुदीप्रमाणे फक्त १ किलोमीटर अंतरातील शाळाच विद्यार्थ्यांना निवडता येणार आहे. अशा प्रकारचे १ किलोमीटरचे बंधन टाकणे ही तरतूद मूळ कायद्यांशी, तत्त्वाशी विसंगत वाटते. शिक्षण हक्क कायद्यात ही तरतूद येण्याची काही कारणे आहेत. काही देशांत एज्युकेशन व्हाउचर विद्यार्थ्यांना दिले जाते, सरकार एका विद्यार्थ्यांवर जितकी रक्कम खर्च करते, ती रक्कम शाळांना देण्यापेक्षा पालकांच्या हातात कूपन स्वरूपात द्यायची व पालकांनी त्यांना पाहिजे त्या शाळेमध्ये प्रवेश घ्यावा, अशी कल्पना राबवली गेली. ती प्रायोगिक तत्त्वावर भारतात कशी राबवावी, याबाबत अनेकदा चर्चा झाल्या. दिल्लीत सेंटर फॉर सिव्हिल सोसायटी ही संस्था या कल्पनेच्या प्रसारासाठी अनेक वर्षे काम करते. त्यांनी दिल्लीतील काही शाळांमध्ये अशा प्रकारचे कूपन वाटपही केले होते. अकराव्या पंचवार्षिक योजनेत केंद्र शासनाने याविषयी प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करण्याची सूचनाही केलेली होती. जर श्रीमंतांना हवी ती शाळा निवडता येते तर गरीब, वंचितांनाही ती संधी असली पाहिजे, हे या कायद्यातील मुख्य तत्त्व दिसून येत आहे. गरीब विद्यार्थ्यांना सरकारी शाळांमध्येच शिक्षण घेण्याची सक्ती नको. कोणतीही चांगली शाळा तळागाळातील पालकांना निवडता आली पाहिजे, हे या कायद्यातील प्रमुख तत्त्व या योजनेत डावलले जाणार आहे. दुसरी भूमिका अशी होती, की आज श्रीमंतांच्या शाळा आणि गरिबांच्या शाळा अशी विभागणी शालेय शिक्षणात निर्माण झाली आहे. कोठारी आयोगाने गरीब व श्रीमंत विद्यार्थ्यांनी एकाच शाळेत शिकावे, अशी भूमिका मांडली. कोणत्याही सरकारांना ते करता आले नाही. मोठ्या प्रमाणात खासगी शाळांना परवानगी दिल्याने व आर्थिक स्तराप्रमाणे शाळांचे वर्गीकरण झाल्याने शालेय शिक्षणातच सामाजिक विषमतेची बीज रोवले गेले. श्रीमंतांसाठी खासगी शाळा व गरिबांसाठी सरकारी शाळा असे समीकरण दृढ झाले. तीच विषमता पुढे समाजात प्रतिबिंबित झाली. आता मागे फिरता येत नसल्यामुळे श्रीमंतांच्या खासगी शाळांमध्ये सक्तीने २५ टक्के गरीब, वंचितांची मुले शिकतील. त्यामुळे श्रीमंत व गरीब मुले एकत्र शिकून सामाजिक विषमता काही प्रमाणात कमी होऊ शकेल, असाही दृष्टिकोन या कायद्यामागे आहे. वास्तविक सर्वांनाच घराजवळच्या शाळेत शिकण्याची सक्ती केली असती व शाळांचे स्तरीकरण केले नसते तर विषमता तयार झाली नसती. एक किलोमीटर अंतराचे कारण हे की ज्या प्रसिद्ध खासगी शाळा आहेत, त्या शाळांमध्ये प्रवेश मिळण्यासाठी किमान पाच किलोमीटरमधील पालक प्रयत्न करायचे व त्यांच्या घराच्या जवळ शाळा असूनही त्या शाळांमधील प्रवेश मात्र होत नव्हते. कारण त्या कनिष्ठ दर्जाच्या आहेत, असे नागरिकांचे/समाजाचे मत असते. त्यामुळे विशिष्ट शाळांसाठी गर्दी व इतर शाळा रिकाम्या, यामुळे राज्यातील शाळांची प्रवेश संख्या घटत होती, या तरतुदीनुसार जवळच्या शाळेतच प्रवेश घेणे सक्तीचे केल्याने काही अंशी सर्वच खासगी शाळांमध्ये प्रवेश होतील, हे कारण आहे. एक किलोमीटरमध्ये जर शाळा उपलब्ध नसेल किंवा त्या शाळेतील प्रवेश होऊन गेले असतील तर विद्यार्थ्यांना आजूबाजूच्या सरकारी शाळांमध्ये सक्तीने प्रवेश घ्यावाच लागेल. त्यामुळे काही प्रमाणात सरकारी शाळांची पटसंख्या सावरायला मदत होईल, असे शासकीय धोरण आहे. सरकारचा यामागचा हेतू फी प्रतिपूर्ती रकमेचा बचत करण्याचा आहे. शाळांना सध्या तीन हजार कोटींपेक्षा जास्त रक्कम द्यायची आहे. केंद्र सरकार त्यातील ६० टक्के वाटा देणार असले, तरी राज्याने अगोदर ती दिली तरच केंद्र सरकार आपला वाटा देणार आहे. अशा वेळी एक किलोमीटर मधीलच शाळा निवडण्याचा कायदा राज्यामध्ये आर्थिक बचतीला हितकारक ठरेल, असा शासनाचा व्यावहारिक विचार आहे. या कायद्याप्रमाणे आदिवासी विद्यार्थी खासगी इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश घेतात. त्यांची प्रतिविद्यार्थी ५० हजार रुपये फी आदिवासी विभाग आज भरतो, असे किमान दीड लाख लाभार्थी आहेत. धनगर व इतर वंचित विद्यार्थ्यांसाठीही अशीच योजना सुरू झाली आहे. या सर्व योजनांमध्ये सर्व इंग्रजी शाळा या दर्जे दार, नामवंत असतात, हे समाजाने गृहीत धरलेले आहे. शिक्षण हक्क कायद्यात आणखीही सुधारणा अपेक्षित आहेत. आठवीनंतर नववी, दहावीच्या फीचे काय करायचे? खासगी शाळा स्नेहसंमेलन, सहल व इतर अनेक खर्चासाठी पालकांना आर्थिक भार देतात, याबाबतही काही नियमावली आवश्यक आहे. नियम तयार करताना अनेकदा विचार करून अंमलबजावणी

# शिक्षकांनी शिक्षण पद्धतीत पारंपरिकतेऐवजी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा - तृप्ती अंधारे

## शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हा परिषद,लातूर

### दयानंद विज्ञान महाविद्यालयात गणित व विज्ञान विषयाच्या शिक्षकांसाठी एक दिवसीय फ्यूचर रेडी टिचर राज्यस्तरीय कार्यशाळा




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ही शिक्षणाची पंढरी असून लातूर शैक्षणिक पॅटर्नमध्ये दयानंद शिक्षण संस्था व दयानंद विज्ञान महाविद्यालयाचा मोलाचा वाटा आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ही संस्था व संस्थेची सर्वंच महाविद्यालये सातत्याने नावीन्यपूर्ण विविध उपक्रम राबवितात.त्याचप्रमाणे त्यांचा आदर्श घेऊन प्रत्येक शाळांनी व शाळेतील शिक्षकांनी मार्गक्रमण केले पाहिजे.प्रत्येक शिक्षकांनी बदलत्या काळानुसार पारंपरिक पद्धतीऐवजी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शिक्षण पद्धतीत करावा.शिक्षकांनी विद्यार्थी केंद्रबिंदू मानून स्मार्ट टीचिंग व आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर अध्ययन- अध्यापन पद्धतीत करावा. आभासी व तंत्रज्ञानाच्या युगातील सर्व आव्हानांना तोंड देत शिक्षकांनी आपापल्या विषयांत पारंगत, तज्ज्ञ व अनुभवी बनले पाहिजे.स्वतःला अद्ययावत ठेवत विद्यार्थ्यांना स्किल बेसड् ज्ञान व क्रिटिकल थिंक करायला लावणे ही आधुनिक काळाची खरी गरज आहे.काळ कितीही बदलला असला तरी शिक्षकांची जागा कोणतेही आधुनिक तंत्रज्ञान घेऊ शकत नाही.कारण तंत्रज्ञान भावना, प्रेम व अनुभव शेअर करू शकत नाही.शिक्षक हाच खरा मार्गदर्शक असतो. ही मार्गदर्शकाची भूमिका प्रामाणिकपणे बजावत आदर्श, चारित्र्यसंपन्न,सुसंस्कृत व गुणवंत विद्यार्थी प्रत्येक शिक्षकांनी घडविले पाहिजेत, असे प्रतिपादन जिल्हा परिषद लातूरच्या शिक्षणाधिकारी(योजना ) तृप्ती अंधारे यांनी केले.

येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मूळ संकल्पनेतून दि.१४ मार्च २०२६ रोजी विद्यार्थ्यांची विचार करण्याची क्षमता वाढविण्यासाठी फ्युचर रेडी टीचर - २०२६ या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी कार्यशाळेच्या उद्घाटक व प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या.या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड होते.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी, तज्ज्ञ साधन व्यक्ती प्रकाश कमाले,विजयकुमार किलचे, गौरव बाहेती व सौ.जान्हवी बाहेती यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे एडिओ डॉ.जयप्रकाश दरगड म्हणाले की,भारताला विकसित राष्ट्र व जागतिक महासत्ता म्हणून पुढे आणण्यासाठी इतर क्षेत्रांच्या विकासाबरोबर शालेय, माध्यमिक ,उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर विकास घडवून आणण्यासाठी केंद्र व राज्य शासन पुढाकार घेत आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणात आमूलाग्र बदल होत आहेत.पूर्वी गुरुकुल पद्धती होती.आज मात्र टेक्नॉलॉजी,इंटरनेट,विविध ॲप्स,स्मार्ट बोर्ड अशा डिजिटल शिक्षणावर भर दिला जात आहे.त्यामुळे प्रत्येक शिक्षकांनी स्मार्ट व ट्रेनड् बनले पाहिजे, त्यामुळे इतर देशांबरोबर भारत हा देश शिक्षणांच्या बाबतींत अग्रेसर राहील असे ते म्हणाले.

प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळा घेण्यामागची भूमिका सांगत असताना शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा व ते स्मार्ट कसे बनले पाहिजेत,याची ट्रेनिंग त्यांना मिळावी अशा अनेक उद्देशातून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली असे त्यांनी सांगितले तर आभार पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर यांनी मानले.सूत्रसंचालन डॉ. कोमल गोमारे व प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी संयुक्तरित्या केले.या कार्यशाळेत राज्यातील तसेच लातूर जिल्ह्यातील विविध शाळांतील इयत्ता ०९ वी व १० वी ला गणित व विज्ञान विषय शिकवणारे शिक्षक, महाविद्यालयातील इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# प्रशासन लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान असल्याचे कामातून दाखवून द्या

### माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांचे आवाहन
### बाभळगाव येथे महाराजस्व अभियान समाधान शिबिराचे उद्घाटन



**लातूर/प्रतिनिधी :** प्रशासकीय यंत्रणेने अधिक दक्ष राहून शासन लोकाभिमुख आणि गतिमान असल्याचे आपल्या कार्यातून सिद्ध करावे, असे आवाहन आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले. शासनाच्या सर्व योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेला मिळावा आणि आवश्यक कागदपत्रे सहज उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान २०२६ अंतर्गत बाभळगाव येथे समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन यांच्या हस्ते पार पडले, यावेळी ते बोलत होते.

या अभियानांतर्गत लातूर तालुक्यातील बाभळगाव येथे आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर दीप प्रज्वलनाने शिबिराचा अधिकृत प्रारंभ झाला.

यावेळी आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात लाभ वाटप व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी त्यांनी महसूल विभागाने लावलेल्या विविध योजनांच्या स्टॉल्सला भेट देऊन माहिती घेतली.

यावेळी पूढे बोलतांना या अभियानाच्या निमित्ताने प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांनी अत्यंत दक्ष राहून, शासन खरोखरच लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान असल्याचे आपल्या कामातून दाखवून द्यावे. तसेच विविध संस्थांमधील लोकप्रतिनिधींनीही या अभियानाच्या आणि शिबिरांच्या माध्यमातून जनतेचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन याप्रसंगी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी केले.

महसूल, भूमी अभिलेख, कृषी, सहकार, बँकिंग, पुरवठा यांसह इतर सर्वच विभागांच्या विविध योजनांचा लाभ गरजू लाभार्थ्यांना मिळावा; तसेच आधार कार्ड, मतदान कार्ड यांसह सर्व प्रकारची प्रमाणपत्रे सहजगत्या उपलब्ध व्हावीत यासाठी हे अभियान अत्यंत महत्त्वाचे आहे. विविध महसूल मंडळांच्या ठिकाणी आयोजित करण्यात येत असलेल्या या शिबिरांचा जनतेला मोठा लाभ होईल, असा विश्वासही यावेळी त्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, जिल्हा परिषद सदस्य महादेव मस्के, लातूर पंचायत समितीचे सभापती श्रीकांत बैले, उपसभापती महेश चव्हाण, पंचायत समिती सदस्य प्रिया उपाडे, पूजा जाधव, बाभळगाव ग्रामपंचायतच्या प्रशासक प्रिया सचिन मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी सागर मुळीक, नायब तहसीलदार सुधीर देशमुख, मंडळ अधिकारी सुनील लाडके यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले.

## सावधान! तुम्ही देखील फुटाणे खाता होऊ शकतो कॅन्सर

आपल्यापैकी अनेकांना भाजलेले चणे म्हणजे फुटाणे खायला आवडते. भाजलेले चणे खाल्ल्याने एक ना अनेक समस्या दूर होऊ शकतात. भाजलेले चणे खाल्ल्याने पचनक्रिया सुरळीत होते. वजन कमी करणाऱ्यांसाठी हे उत्तम मानले जातात. रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी देखील भाजलेले चणे फायदेशीर आहेत. भाजलेल्या चण्यामधील कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस ऑस्टियोपोरोसिस सारख्या हाडांच्या आजारांचा धोका कमी करते. यातील प्रथिने आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेचे मुक्त रॅडिकल्सपासून संरक्षण करतात. भाजलेल्या चण्यामध्ये आढळणारे फोलेट बाळाच्या मेंदू आणि पाठीच्या कण्याच्या विकासात मदत करते.

भाजलेल्या चण्यामध्ये ऑरामाइन ओ: परंतु तुम्हाला माहिती आहे काय आरोग्यासाठी उत्तम मानले जाणारे भाजलेले चणे कर्करोगाचा गंभीर धोका निर्माण करू शकतात. दिल्लीच्या बाजारपेठांमध्ये भाजलेल्या चण्यांमध्ये 'ऑरामाइन ओ' नावाच्या विषारी रसायनाची भेसळ आढळली आहे. या रसायनामुळे कर्करोगाचा धोका वाढतो. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी छापे टाकून भेसळ उघडकीस आणले आहे आणि लोकांना भेसळयुक्त चण्यांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे.

यकृत, मूत्रपिंड आणि कर्करोगाचा धोका: राष्ट्रीय राजधानीत, पौष्टिक नाश्त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या भाजलेल्या चण्यांमध्ये 'ऑरामाइन ओ', कापड रंगविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या औद्योगिक रंगाची भेसळ केली जात आहे. यामुळे भाजलेले चणे विषारी बनले आहेत, ज्यामुळे यकृत, मूत्रपिंड आणि कर्करोगासारखे आजार होतात. लाजपत नगरसारख्या प्रमुख बाजारपेठांमध्ये विकल्या जाणाऱ्या भाजलेल्या चण्यांमध्येही ही भेसळ आढळली आहे. या भेसळीच्या सेवनामुळे आरोग्याचे धोके वाढतात, विशेषतः मुले, गरोदर महिला आणि वृद्धांना त्यामुळे न्यूरोलॉजिकल विकार होऊ शकतात आणि पचनसंस्थेचे नुकसान होऊ शकते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या (ैकध) इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सर (घ्अींण) ने ते कार्सिनोजेन (मानवांमध्ये कर्करोग होण्यास सक्षम) घोषित केलं आहे. राज्यसभा सदस्य प्रियांका चतुर्वेदी यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा आणि अन्न प्रक्रिया मंत्री चिराग पासवान यांना पत्र लिहून त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे. इएएअघ आणि अन्न सुरक्षा विभागाने दिल्ली येथील बाजारपेठांमध्ये विकल्या जाणाऱ्या भाजलेल्या चण्यांविरुद्ध मोहीम सुरू केली आहे. विविध बाजारपेठांमधून २०० नमुने घेण्यात आल्याचे वृत्त आहे. प्राथमिक तपासणीत यापैकी ४० टक्के नमुन्यांमध्ये ऑरामाइन ध असल्याचं आढळून आलं आहे.

भेसळ कशी ओळखावी

दाब चाचणी: चणे बोटांनी दाबा. भेसळयुक्त चणे नैसर्गिक नसून पावडरमध्ये बदलतात.

रंग चाचणी: कोमट पाण्यात १० मिनिटे भिजवा. जर पाणी पिवळे झाले किंवा चण्याचा रंग बाहेर आला तर ते ऑरामाइन दर्शवते.

चव चाचणी: जर तुम्हाला विचित्र, रासायनिक चव येत असेल, जरी ते कुरकुरीत दिसत असले तरी, सावध रहा.

## घरी तयार करा फेशल स्क्रब, चेहरा दिसेल स्वच्छ आणि उजळ, या पर्यायांचा करा वापर

चेहऱ्याची काळजी घेण्यासाठी, मृत त्वचा निघून जाण्यासाठी स्क्रबचा वापर सर्रास केला जातो. स्क्रबमुळे चेहऱ्यावरचं जास्तीचं तेल, मृत त्वचेच्या पेशी यामुळे काढून टाकल्या जातात आणि त्वचा पूर्वीपेक्षा उजळ आणि तजेलदार दिसते.

चेहरा स्वच्छ, फ्रेश दिसावा यासाठी घरीही चांगले स्क्रब बनवता येतात. बाजारातून महागडे स्क्रब खरेदी करण्याऐवजी, हे स्क्रब वापरुन बघा. यासाठी ओटमील, मुलतानी माती, कोरफड, कॉफी, नारळाचं तेल यापासून वेगवेगळे स्क्रब तयार करता येतात.

**ओटमील स्क्रब** – हा स्क्रब बनवण्यासाठी ओटमील, ऑलिव्ह ऑइल, दूध आणि गुलाबजल हे साहित्य आवश्यक आहे. दोन चमचे भिजवलेल्या ओट्समध्ये एक चमचा ऑलिव्ह ऑइल, एक चमचा दूध आणि काही थेंब गुलाबजल घाला. हा स्क्रब चेहऱ्यावर लावा आणि घासून घ्या आणि नंतर चेहरा धुवून स्वच्छ करा. यामुळे त्वचा उजळते आणि त्वचेचा पोत सुधारतो.

मुलतानी माती आणि कोरफड – मुलतानी माती आणि कोरफडापासून स्क्रब बनवता येतो आणि चेहऱ्यावर लावता येतो. हा स्क्रब बनवण्यासाठी, एक चमचा मुलतानी मातीत आवश्यकतेनुसार कोरफड जेल घाला आणि ते चेहऱ्यावर लावून घासून घ्या. एक-दोन मिनिटं घासल्यानंतर, चेहरा धुवून स्वच्छ करा.

कॉफी आणि नारळ तेल स्क्रब – कॉफी आणि मधाच्या स्क्रबमुळे चेहऱ्यावरील मृत त्वचेच्या पेशी काढून टाकल्या जातात. या स्क्रबमुळे मुरुमं कमी होतात आणि त्वचेचं प्रखर सूर्यप्रकाशापासून संरक्षण होतं. हा स्क्रब बनवण्यासाठी, दोन चम चे कॉफीत एक चमचा साखर आणि थोडंसं खोबरेल तेल मिसळा. हा स्क्रब चेहऱ्यावर लावून घासा आणि नंतर चेहरा धुवा.

साखर आणि मधाचे स्क्रब – त्वचेच्या आरोग्यासाठीही या स्क्रबचा चांगला परिणाम होतो. स्क्रब बनवण्यासाठी, मध आणि साखर मिसळा. स्क्रब बनवण्यासाठी बारीक दाणेदार साखर वापरा. ??हे स्क्रब बोटांवर लावा आणि चेहऱ्यावर घासून घ्या आणि नंतर ते धुवा. या सगळ्या नैसर्गिक पर्यायांमुळे चेहरा फ्रेश दिसेल पण तुम्हाला कोणत्याही प्रकारची एलर्जी असेल तर हा स्क्रब लावण्यापूर्वी पॅच टेस्ट करायला विसरु नका.

## अधिकाधिक मालमत्ता धारकांनी सुवर्ण संधीचा लाभ घेऊन थकित मालमत्ता कर भरणा करावा - आयुक्त मानसी

लातूर/प्रतिनिधी : महापालिकेच्या कर संकलन विभागामार्फत नागरिकांसाठी ७० टक्के शास्ती माफी योजना जाहीर करण्यात आली असून, या योजनेचा अंतिम दिनांक १३ मार्च २०२६ होती. परंतु थकबाकीदार मालमत्ता धारकांची मुदत वाढ बाबत मागणी असल्याने २ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. थकीत मालमत्ता कर असलेल्या नागरिकांसाठी ही योजना मोठा दिलासा ठरणार आहे. महापालिकेच्या हद्दीतील मोठ्या प्रमाणावर प्रलंबित मालमत्ता कर बाकी असून त्याची वसुली गतीमान करण्यासाठी ही विशेष सुट योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत नागरिकांनी १५ मार्च पूर्वी एकरकमी कर भरल्यास शास्तीपैकी तब्बल ७० टक्के माफी मिळणार आहे.

दरम्यान, प्रलंबित कर वसुलीसाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. दररोज क्षेत्रस्तरावर वसुली मोहीम, नोटीस वाटप आणि करदात्यांशी थेट संवादाच्या माध्यमातून जागृती केली जात आहे. १५ मार्चनंतर प्रलंबित करदारांवर जप्ती इत्यादी कठोर कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही कर विभागाने स्पष्ट केले आहे.

नागरिकांनी ही सुवर्णसंधी ओळखून प्रलंबित कर तात्काळ भरावा आणि ७०% शास्ती माफीचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर शहर कर संकलन विभागाने केले आहे.

# बंगालच्या सशस्त्र क्रांतीचा पडद्यामागचा शिल्पकार

**गाऊ त्यांना आरती , शिरीष चिटणीस**

लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू, सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद अशा व्यक्तिमत्त्वांबरोबरच त्यांच्या आणि इतरांच्या नेतृत्वाखाली असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी आपले आयुष्य भारताच्या स्वातंत्र्यासाठी अर्पण केले. मुख्य प्रवाहाच्या मागे पडद्यामागून कार्य करणार्या असंख्य क्रांतिकारकांचे योगदान तितकेच महत्त्वाचे होते. अशा अत्यंत प्रभावी क्रांतिकारकांपैकी एक नाव म्हणजे बंगालमधील श्रीशचंद्र पाल. ढाका परिसरात जन्मलेला हा तरुण पुढे कोलकात्याच्या राजकीय रंगमंचावर असा उदयास आला की, ब्रिटिश साम्राज्याचा कणा हादरवणार्या ठेववर -ईी कशळींीं (रोड्डा आर्म्स हाईस्ट) या अभूतपूर्व शस्त्रलुटीचा तो मुख्य शिल्पकार मानला जातो.

श्रीशचंद्र पाल यांचा जन्म १८८७ च्या सुमारास ढाका जिल्ह्यातील मुलबर्गा/मुलबरीया या भागात एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. पूर्व बंगालचा हा भाग त्या काळी शिक्षित मध्यमवर्ग, नव्याने घडणार्या शहरी संस्कृती आणि इंग्रजी शिक्षण यांचा संगम बनत होता. ब्रिटिश राजवटीची कठोरता, सामाजिक असमानता आणि परकीय सत्तेने केलेले आर्थिक शोषण याविषयी जाणीव होताच तरुण पिढीत असंतोषाचा ज्वालामुखी धुमसत होता. या राजकीय सामाजिक वाता-वरणानेच श्रीशचंद्र पाल यांच्या विचारविश्वाला आकार दिला.

स्वदेशी चळवळ

१९०५ ची बंगाल फाळणी ही त्यांच्यासाठी निर्णायक घटना ठरली. हिंदू-मुस्लिम वैमनस्य उभे करण्याच्या राजकीय उद्देशाने केलेल्या या फाळणीविरुद्ध संपूर्ण बंगाल पेटून उठला. लोकमान्य टिळक यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे अत्यंत निकटचे सहकारी अरविंद घोष आणि इतरांनी बंगालमध्ये स्वदेशी वस्तूंचा स्वीकार, विदेशी मालाचा बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण संस्था उभारणे आणि गुप्त संघटनांची निर्मिती यासाठी आपले जीवन समर्पित केले. ही सर्व संघर्षाची प्रमुख साधने बनली. बंगालमध्ये विद्यार्थीवर्गात प्रचंड असंतोष आणि राष्ट्रप्रेमाचा आवेग निर्माण झाला. ब्रिटिश भारतात बंगाल प्रांत सर्वांत मोठा होता. या लाटेत श्रीशचंद्र पालही वाहत गेले आणि केवळ भावनिक देशभक्तीवर न थांबता प्रत्यक्ष क्रांतिकारक मार्गाचा स्वीकार त्यांनी केला. ढाका-कोलकाता या द्विभाषिक, द्विसांस्कृतिक क्षेत्रा-तील तरुण म्हणून श्रीशचंद्र पाल यांनी पूर्व बंगाल आणि पश्चिम बंगालमधील क्रांतिकारी चळवळीमध्ये एक प्रकारचा दुवा म्हणून काम केले.



बंगाल फाळणीनंतर ढाका परिसरात निर्माण झालेल्या गुप्त क्रांतिकारक संघटनांपैकी मुक्ति संघ ही एक महत्त्वाची संस्था होती. हेमचंद्र घोष यांच्या नेतृत्वाखाली चालणार्या या संघटनेचा उद्देश ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र उठावाची दीर्घकालीन तयारी करणे हा होता. तरुणांना शारीरिक व लष्करी प्रशिक्षण देणे, शस्त्रसाठा उभारणे, गुप्त संदेशांची देवाणघेवाण, पोलिसांचे हालचालीवर लक्ष ठेवणे, तसेच आवश्यक तेथे दहशतवादी कारवाया करणे या सर्व गोष्टी संघटनेच्या कार्यक्रमात होत्या. याच मुक्ति संघात श्रीशचंद्र पाल यांनी प्रवेश केला. तरुण वयातच त्यांचे संघटनकौशल्य, धैर्य आणि संयमाचे दर्शन सहकार्यांना झाले. काही क्रांतिकारक तत्काळ दहशतवादी कारवायांमध्ये स्वतः ला झोकून देत असताना पाल यांना दीर्घकालीन रणनीती आणि प्रभावी नियोजन याचे महत्त्व जाणवत होते. पुढे हीच संघटना इशपसरश्र तेर्श्रींपींशर्शी (बेंगाल व्हॉलंटियर्स) या नावानेही ओळखली जाऊ लागली आणि बंगालमधील अनेक दहशतवादी कारवायांचे केंद्र बनली.

उग्र राष्ट्रवाद

श्रीशचंद्र पाल यांची विचारधारा अत्यंत उग्र राष्ट्रवादी स्वरूपाची होती. त्यांना ब्रिटिश राजवटीचा पराभव हेच अंतिम ध्येय मान्य होते आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व साधनांचा वापर योग्य आहे, असा त्यांचा विश्वास होता. अहिंसक चळवळीचा त्यांनी अवमान कधीच केला नाही; परंतु त्यांच्या दृष्टीने अहिंसा हे एक साधन असू शकते, अंतिम व एकमेव मार्ग नाही. हिंसा किंवा सशस्त्र प्रतिकार ही त्यांच्यासाठी दडपशाही संपवण्याची राजकीय भाषा होती.या विचारातूनच राजकीय हत्या किंवा राजकीय सूड याला त्यांनी न्याय्यतेची चौकट दिली. पोलिसांचे अत्याचार, निर्दोषांवर करण्यात आलेली क्रूरता आणि न्यायालयीन अन्यायाला उत्तर म्हणून राज्यकर्त्यांना भीती दाखवणारी प्रतिहिंसा आवश्यक आहे, असे ते मानत. यामुळेच पुढे नंदलाल बॅनर्जीच्या हत्येप्रकरणी त्यांनी स्वीकारलेली भूमिका केवळ वैयक्तिक सुडावर आधारित नसून व्यापक राजकीय संदेश देणारी ठरते. १९०८ मध्ये मुजफ्फरपूर बॉम्बस्फोटानंतर प्रफुल्ल चाकी या तरुण क्रांतिकारकाचा मृत्यू झाला. त्याच्या अटकेत व पाठलागात कोलकात्याचा पोलिस अधिकारी नंदलाल बॅनर्जी याची मोठी भूमिका होती; प्रफुल्ल चाकीने पकड टाळण्यासाठी स्वतःवर गोळी झाडली असली तरी त्याच्या मृत्यूसाठी जबाबदार म्हणून नंदलाल या पोलिस अधिकार्याकडे पाहिले जाऊ लागले. ढाका कोलकाता क्रांतिकारक वर्तुळात या घटनेने प्रचंड संताप उसळला.

मुक्ति संघ आणि आत्मोन्नति समिती या दोन गुप्त संघटनांच्या नेत्यांनी नंदलालचा खून करण्याचा निर्णय घेतला. हे काम श्रीशचंद्र पाल व रानेन गांगुली या दोघांना देण्यात आले. ९ नोव्हेंबर १९०८ रोजी कोलकात्यातील डशीशिपींळपश डरपश (सर्पेंटाइन लेन) येथे दिवसाढवळ्या केलेल्या हल्ल्यात नंदलालचा खून करण्यात आला. ही कारवाई अत्यंत वेगाने आणि नियोजनपूर्वक पार पडली. हल्ल्यानंतर दोघेही गुप्त झाले आणि दीर्घकाळ पोलिसांच्या हाती लागले नाहीत. या हत्येचा परिणाम दोन स्तरांवर झाला. एका बाजूला ब्रिटिश प्रशासनात दहशत पसरली. पोलिस अधिकारी आणि गुप्तहेरांना प्राणभय जाणवू लागले. दुसरीकडे, युवक क्रांतिकारकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण

**(क्रमशः उद्याच्या अंकात)**

# आवळा आहारात समाविष्ट करण्याचे फायदे जाणून घ्या

आवळा, ज्याला सामान्यतः इंडियन गूसबेरी असेही म्हणतात, हे आपल्या आरोग्यासाठी एक उत्तम सुपरफूड आहे. आवळा, व्हिटॅमिन सी, अँटिऑक्सिडंट्स आणि फायबरने समृद्ध आहे, विशेषतः बीपी आणि रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त आहे. आवळा आहारात समाविष्ट करण्याचे काही सोपे आणि प्रभावी मार्ग जाणून घेऊया. उन्हाळा सुरू होताच शरीरात दिसतात ही ५ लक्षणे; दुर्लक्ष करू नका आवळ्याचे आरोग्य फायदे (आरोग्यासाठी आवळा) आवळ्याचे सेवन केल्याने आपली प्रतिकारशक्ती मजबूत होते, त्वचेचे आरोग्य सुधारते आणि अनेक आजारांपासून बचाव होतो. आवळा विशेषतः बीपी आणि रक्तातील साखरेच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर आहे.

बीपी नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त: आवळ्यामध्ये पोटॅशियम असते, जे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते.

रक्तातील साखरेचे नियंत्रण: आवळा इंसुलिनचे प्रमाण संतुलित ठेवते, त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रणात राहते.

हृदयाचे आरोग्य: आवळा शरीरातील कोलेस्टेरॉलची पातळी कमी करून हृदय निरोगी ठेवते.



आवळा आहारात समाविष्ट करण्याचे मार्ग (आहारात आवळा कसा समाविष्ट करावा)

१. आवळा रस

आवळ्याचा रस सकाळी रिकाम्या पोटी पिणे खूप फायदेशीर आहे. हे प्यायल्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहते आणि बीपीही नियंत्रणात राहते.

कसे बनवायचे:

एका आवळ्याचा रस काढा आणि एका ग्लास पाण्यात मिसळा. आपण चवीनुसार मध घालू शकता.

२. आवळा मुरब्बा

आवळा मुरब्बा केवळ स्वादिष्टच नाही तर त्यात पोषक तत्वे देखील असतात. ज्यांना गोड खाणे आवडते त्यांच्यासाठी हा एक चांगला पर्याय आहे.

३. आवळा पावडर-आवळा पावडर बाजारात सहज उपलब्ध आहे. ते पाणी किंवा मधासोबत घ्या. हे बीपी नियंत्रित करण्यास आणि रक्तातील साखरेचे प्रमाण

# दिलासा



**खुलासा की दिलासा?**

होर्मुझची सामुद्रधुनी व्यावसायिक जहाजांसाठी बंद झाल्याने या मार्गावरून आतापर्यंत येणारे ४५ टक्के खनिज तेल येणे खंडित झाले आहे. आता भारताने आपला ७० टक्के पुरवठा इतर मार्गांकडे वळवला आहे. जर परिस्थिती सामान्य आहे, असे मान्य केले तरी गॅसची दरवाढ आणि नोंदणीचे बदललेले निकष कशासाठी असा प्रश्न पडतो. देशातील ६० टक्के गॅसची मागणी आयातीवरच अवलंबून असल्याने पश्चिम आशियातील तणावामुळे या पुरवठा साखळी-वर परिणाम झाला आहे. व्यावसायिक सिलिंडरच्या पुरवठ्यात कपात करून घरगुती पुरवठा सुरक्षित करण्यात आला आहे. सरकारी आकडेवारीनुसार केवळ ५० दिवसांचा साठा उपलब्ध आहे. गॅसचा साठा पूर्णतः संपला नसला तरी पुरवठ्याचे मार्ग विस्कळीत झाल्याने काही दिवसात टंचाई अधिक तीव्र होईल, ही बाब कशी नाकारता येईल? सरकार जरी इंधनाचा साठा पुरेसा असल्याचे सांगत असले तरी प्रत्यक्षात ग्राहकांचा अनुभव वेगळाच आहे. सरकारची आकडेवारी एकूण साठ्यावर आधारित आहे; पण लोकांची घबराट प्रत्यक्ष दररोजच्या उप-लब्धतेवर आधारित आहे. युद्धाची परिस्थिती सुधारत नाही तोपर्यंत ही विसंगती कायम राहील.

इराण आणि इस्रायल-अमेरिका युद्धाचे परिणाम आता दिसू लागले आहेत. पुणे-मुंबईच नव्हे, तर देशभरातील मोठ्या शहरात आणि ग्रामीण भागात गॅस वितरणावर मोठा परिणाम झाला असून, अनेक ठिकाणी गॅस सिलिंडरसाठी मोठ्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सिलिंडरचा काळाबाजार सुरू झाला असून, त्याचे दर साठ रुपयांनी वाढले असूनही काळ्याबाजारात सिलिंडरला अधिक पैसे द्यावे लागत आहेत. शहरी भागात सिलिंडरच्या नोंदणीची मुदत २१ दिवसांवरून २५ दिवस केल्यानंतर आता ती ग्रामीण भागात ४५ दिवसांवर नेण्यात आली आहे. पुण्यासारख्या शहरात तर गॅस सिलिंडरच्या नोंदणीचे फोनच बंद असतात किंवा नोंदणीच स्वीकारली जात नाही. व्यावसायिक गॅस सिलिंडरबाबतचा अनुभव अधिक गंभीर आहे. मागणी वाढल्याने मनमानी पद्धतीने गॅसला किंमत मोजावी लागत आहे. परिस्थिती अशीच राहिल्यास येत्या काही दिवसात हॉटेल-खानावळींना कुलूप लावावे लागले तर नवल नाही. देशभरात अशीच परिस्थिती असताना केंद्र सरकार आणि राज्य सरकार सुस्त आहे. पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी आणि त्या मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी देशात घरगुती गॅस सिलिंडरचा मुबलक साठा आहे, खनिज तेलाचा पुरवठाही सुरक्षित आहे. ग्राहकांनी घाबरून जाऊ नये, अफवा पसरवू नये, असे आवाहन केले आहे. लोकसभेत पुरी यांनी पंतप्रधानांच्या धोरणाचे कौतुक करीत त्यांच्या मुत्सद्दी धोरणामुळे भारताची इंधन सुरक्षा पूर्णपणे सुरक्षित असल्याचे सांगितले. गेल्या पाच दिवसांत एलपीजी उत्पादनात २८ टक्क्यांची वाढ झाली असून, देशातील ३३ कोटी कुटुंबांना विशेषतः गरीब कुटुंबांना गॅस टंचाईचा सामना करावा लागणार नसल्याचे सांगत आश्वस्त केले आहे. देशात सीएनजीचा पुरवठा १०० टक्के सुरळीत आहे. विरोधक अफवा पसरवत असून गॅस मिळणार नाही, या भीतीपोटी गॅसला मागणी वाढली आहे, असे त्यांनी सांगितले आहे.

गॅस वितरक उपलब्ध नाही, म्हणत आहेत आणि नोंदणीही नाकारत आहेत. टंचाई नसेल तर मग निर्बंध तरी कशासाठी ? यामुळे सरकार काही लपवू पाहत असल्याची शंका बळावते. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे सरकारने वस्तुस्थिती लपवू नये हेच म्हणत आहेत. जेव्हा सरकार अधिकृतपणे काही अडचणी आहेत, असे स्पष्टपणे सांगण्याऐवजी सर्व काही आलबेल आहे असे म्हणते तेव्हा लोक त्यावर विश्वास ठेवण्याऐवजी समाज माध्यमांवरील माहितीवर अधिक विश्वास ठेवू लागतात. जेव्हा सरकार गॅसला इंडक्शन शेगड्यांचा पर्याय सुचवते तेव्हा सरकारवर विश्वास कसा ठेवणार? सिलिंडरच्या किमती वाढवल्यानंतरही पुरवठा सुरळीत आहे, असे कसे म्हणता येईल? पेट्रोलियम मंत्र्यांनी त्यांच्या निवेदनात तांत्रिक मुद्दे दिले असले तरी वास्तव स्थिती वेगळी असल्याने त्यांचा खुलासा दिलासा देण्याऐवजी फसवा वाटू लागतो. जेव्हा अनिश्चितता असते त्यावेळी पारदर्शक माहिती देण्याऐवजी लोकांवरच ठपका ठेवला जातो तेव्हा तो दिलासाही फसवा वाटू शकतो.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

कीवी-हे एक छोटेसे फळ आहे जे पुर्णपणे व्हिटामीन सी ने भरलेले आहे. जवळजवळ १२०% व्हिटामीन सी कीवी मध्ये आढळतं. किवी तुमच्या त्वचेला मुलायम ठेवण्यात साहाय्यक आहे. अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रीशन मध्ये प्रकाशीत झालेल्या अभ्यासानुसार ज्या आहारात व्हिटामीन सी भरपुर प्रमाणात असतं त्याचे सेवन केल्याने चेहे-यावरील सुरकुत्या आणि मुरूमांसारखे प्रकार दुर होतात.



पुरुषांच्या लैंगिक प्रतिसादात लैंगिक उत्तेजना, शिश्नाची ताठरता व वीर्यस्खलन या प्रक्रिया होतात.


## २ Joke — विनोद




सौरव - माझी गाय सुका चारा खात नाही. फक्त हिरवा चारा खाते. पण हिरवा चारा आज मिळत नाही, मी काय करू?

सचिन - गाईच्या डोळ्याला हिरव्या रंगाचा चष्मा लावून टाक म्हणजे गाईला सुका चारा हिरवा दिसेल व ती खाईल.

## ३ Message — संदेश




Santa Banta eating Fish
Santa: oye banta machli khayega?
Banta: nhi yaar usme kaante hote hain.
Santa: oye chadd yaar, chappal pahen ke kha lena.

## ४ Thought — सुविचार




शिक्षणाची मुळे कडू असली तरी त्याची फळे मधूर असतात.
- ॲरिस्टॉटल

**संस्कृत सुभाषित**

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः।**
**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परांगतिम्।।**

जो शास्त्राचे नियम झुगारून देऊन विषयोपभोगांच्या इच्छेप्रमाणे वर्तन करतो, तो सदैव अपयशी होतो, दुःखी होतो व त्याला श्रेष्ठ गती प्राप्त होत नाही.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दुःखी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तर


१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अव-स्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तर

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस




## थोडक्यात/ संक्षिप्त



### पाकिस्तानच्या या खेळाडूला आपलाच संताप पडला महागात

**नवी दिल्ली** –पाकिस्तानचा फलंदाज सलमान आघा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात धावबाद झाल्यानंतर मैदानात संताप व्यक्त केल्यामुळे आयसीसी ने त्याला फटकारले असून त्याच्या खात्यात एक डिमेरिट पॉइंट जोडण्यात आला आहे. पाकिस्तान नॅशनल क्रिकेट टीम आणि बांग्लादेश नॅशनल क्रिकेट टीम यांच्यातील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ही घटना घडली. अर्धशतक झळकावल्यानंतर सलमान आघा खेळत असताना डावाच्या ३९ व्या षटकात बांगलादेशचा कर्णधार मेहेदी हसन मिराझ गोलंदाजीसाठी आला. त्या षटकात मोहम्मद रिझवान ने पुढे येत फटका मारला असता चेंडू नॉन–स्ट्राइक एंडवर उभ्या असलेल्या आघाच्या पायाला लागला.

चेंडू थांबवण्याच्या प्रयत्नात मिराजची आघाशी धडक झाली. मात्र त्यानंतर मिराजने चेंडू पटकन उचलून स्टंप्सकडे फेकला आणि आघाला धावबाद केले. तिसऱ्या पंचाने बाद ठरवल्यानंतर सलमान आघा संतापला आणि त्याने आपले हेल्मेट व ग्लोव्हज मैदानावर फेकून नाराजी व्यक्त केली.

ही कृती आयसीसीच्या आचारसंहितेच्या लेव्हल–१ उल्लंघनात मोडत असल्याचे मानण्यात आले. त्यामुळे आघाच्या खात्यात एक डिमेरिट पॉइंट नोंदवण्यात आला आहे. मागील २४ महिन्यांतील हा त्याचा पहिलाच गुन्हा असल्याचे आयसीसीने स्पष्ट केले असून आघानेही ही शिक्षा स्वीकारली आहे.

### ४ सामने बाहेर, तरीही जिंकला प्लेअर ऑफ द टुर्नामेंट किताब...;

**दिल्ली**–भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज संजू सॅमसन याला आयसीसी पुरुष टी–२० विश्वचषक २०२६ च्या सुरुवातीच्या चार सामन्यांमध्ये प्लेइंग इलेव्हनमधून बाहेर ठेवण्यात आले होते. मात्र त्यानंतर झालेल्या पुनरागमनाने भारताच्या मोहिमेचा चेहरामोहराच बदलून टाकला. या निर्णयामागची खरी कहाणी आता टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर याने सांगितली आहे.

गौतम गंभीरने जिओहॉटस्टारवरील चर्चेत सांगितले की, आम्हाला संजूच्या क्षमतेवर सुरुवातीपासूनच पूर्ण विश्वास होता. त्यामुळेच त्यांनी टीम मॅनेजमेंटसमोर ठामपणे सांगितले होते की या केरळच्या विकेटकीपर–फलंदाजाला पुन्हा प्लेइंग इलेव्हनमध्ये आणणे गरजेचे आहे.

स्पर्धेच्या सुरुवातीला भारताची टॉप–तीन फलंदाजांमध्ये अभिषेक शर्मा फॉर्ममध्ये नव्हता. इशान किशन मात्र चांगली फलंदाजी करत होता, तर तिलक वर्मा संघर्ष करत होता. त्यामुळे पहिल्या काही सामन्यांमध्ये टीम इंडियाला योग्य लय पकडण्यात अडचणी आल्या. पण सुपर–८ टप्प्यात संजू सॅमसन संघात परतताच संपूर्ण चित्रच बदलले.गंभीर म्हणाला की, मफअनेक जण म्हणतील की आम्ही टॉप–ऑर्डरमधील तीन डावखुऱ्या फलंदाजांचा क्रम मोडण्यासाठी हा निर्णय घेतला. पण खरे कारण ते नव्हते. आम्हाला फक्त संघाला अधिक आक्रमक

# बांगलादेशचा पाकिस्तानवर थरारक विजय

कराची:वर्ल्डकपनंतर लगेचच बांगलादेश दौऱ्यावर गेलेल्या पाकिस्तान संघाला वनडे मालिकेत धक्कादायक पराभवाला सामोरं जावं लागलं. बांगलादेशने तिसऱ्या वनडेत विजय मिळवत तीन सामन्यांची मालिका २–१ अशी जिंकली. बांगलादेशने २९० धावांची मजल मारली. सलमान अली अघाच्या शतकाच्या बळावर पाकिस्तानने आव्हान जिवंत राखलं. सलमान बाद झाल्यानंतर शाहीन शहा आफ्रिदीने जिंकण्यासाठी पुरेपूर प्रयत्न केला मात्र तो अपुराच ठरला.

६ चेंडूत १४ धावा असं समीकरण असताना बांगलादेशचा कर्णधार मेहदी हसन मिराझने फिरकीपटू रिषादच्या हाती चेंडू सोपवला. प्रमुख वेगवान गोलंदाजांचे स्पेल पूर्ण झाल्याने मेहदीसमोर रिशादला चेंडू देण्याशिवाय पर्याय उरला नाही. रिषादचा पहिला चेंडू निर्धाव पडला. दुसऱ्या



चेंडूवर त्यानेच शाहीन शहा आफ्रिदीचा झेल सोडत जीवदान दिलं. तिसऱ्या चेंडूवर आफ्रिदीने दोन धावा काढल्या. चौथ्या चेंडूवर पाकिस्तानला एकही धाव काढता आली नाही. पाचवा चेंडू वाईड देण्यात आला. बांगलादेशने रिव्ह्यूचा निर्णय घेतला. एलबीडब्ल्यूचं अपील फेटाळण्यात आलं. मात्र चेंडू आफ्रिदीच्या पायाला लागून गेल्याचं स्पष्ट झाल्याने वाईडचा निर्णय बदलण्यात आला. वाईड रद्द झाल्याने पाकिस्तानसाठी १ चेंडू १२ धावा असं झालं. शेवटच्या चेंडूवर शाहीन शहा आफ्रिदी यष्टीचीत झाला. त्याने ३७ धावांची खेळी केली. बांगलादेशकडून तास्किन अहमदने ४ तर मुस्ताफिझूर रहमानने ३ विकेट्स पटकावल्या. नाहिदने २ विकेट्स घेत त्यांना चांगली साथ दिली.मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने पहिल्याच षटकात साहिबजाहा फरहानला गमावले. पाठोपाठ माझ सादत बाद झाला. अनुभवी मोहम्मद रिझवानला तास्किनने तंबूत परतावलं. १७/३ या स्थितीतून गाझी घोरी आणि अब्दुल समाद



## पाकिस्तानच्या स्टार खेळाडूची निवृत्तीची घोषणा

नवी दिल्ली–टीम इंडियाने नुकताच कॅप्टन सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात टी२० वर्ल्डकप जिंकला होता.या घटनेला आता आठवडला उलटला आहे.याच वर्ल्डकपमध्ये पाकिस्तानचे आव्हान हे सुपर ८ मध्ये संपुष्ठात आलं होत.त्यामुळे पाकिस्तानी टीम प्रचंड निराश झाली होती.त्यानंतर आता पाकिस्तानच्या एका स्टार खेळाडूने निवृत्तीची घोषणा केली आहे. दरम्यान हा खेळाडू नेमका कोण आहे?हे जाणून घेऊयात.

पाकिस्तानचा दिग्गज खेळाडू आणि विकेटकिपर सरफराज अहमदने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. त्यामुळे जवळजवळ दोन दशकांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीचा शेवट झाला आहे. सरफराजने त्याच्या कारकिर्दीत पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये पाकिस्तानला अनेक संस्मरणीय विजय मिळवून दिले आहेत.सरफराज अहमदचा जन्म हा कराचीत झाला होता. सरफराजने नोव्हेंबर २००७ ला भारताविरूद्ध वनडे सामन्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये डेब्यू केला होता. सरफराजने त्याच्या करिअरमध्ये ५४ टेस्ट,११७ वनडे, ६१ टी२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. या सामन्यात त्याने एकूण ६१६४ धावा केल्या होत्या. त्यात त्याने ६ शतक आणि ३५ अर्धशतक केले होते. विकेटकिपर म्हणून ही त्याचा रेकॉर्ड चांगला आहे.त्याने विकेटमागे ३१५ कॅच आणि ५६ स्टंम्पिंग घेतले आहेत.

सरफाराजने ५० वनडे, ३७ टी२० आणि १३ टेस्ट अशाप्रकारे त्याने १०० सामन्यात पाकिस्तान संघाच नेतृत्व केलं होतं. त्याच्या नेतृत्वात पाकिस्तान टी२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत नंबर १ बनली होती. तसेच संघाने सलग ११ टी२० सीरीज जिंकण्याचाही रेकॉर्ड केला होता.

सरफराजच्या कारकिर्दीत त्याने सर्वात मोठा विजय हा इंग्लंड विरूद्ध मिळवला होता. कारण त्याने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. फायनलमध्ये पाकिस्तानने भारताचा १८० धावांनी पराभव करून आठ वर्षानंतर आयसीसी ट्रॉफीवर नाव कोरलं होतं.या विजयानंतर सरफराज एकमात्र असा कर्णधार बनला ज्याने ज्युनिअर आणि सिनिअर दोन्ही स्तरावर आयसीसी ट्रॉफी जिंकली होती.२००६ मध्ये श्रीलंकेत खेळवल्या गेलेल्या आयसीसी अंडर १९ सामन्यात भारताला हरवून पाकिस्तान चॅम्पियन बनला होता.

दरम्यान सरफराज खानची कामगिरी पाहता त्याला पाकिस्तानचा प्रतिष्ठीत नागरिक सन्मान देऊन त्याचा गौरव करण्यात आला होता. तो असा सन्मान मिळवणारा पाकिस्तानचा युवा कर्णधार आहे. दरम्यान मोहम्मद रिझवानने टीममध्ये जागा बनवल्यानंतर सरफराजला खेळण्याची संधी खूपच कमी मिळू लागल्या. सरफराजने पाकिस्तानसाठी शेवटचा सामना हा डिसेंबर २०२३ रोजी पर्थमध्ये खेळला होता.

नुकत्याच पार पडलेल्या टी२० वर्ल्डकपमध्ये पाकिस्तानची कामगिरी खूपच खराब होती,त्यामुळे पाकिस्तान सुपर ८ मधून बाहेर झाली होती.त्यानंतर आता संघात बदलावाची शक्यता असताना पाकिस्तानच्या कोचिंग स्टाफमध्ये त्याला मोठी जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे.

## विश्वचषक पात्रता फेरीच्या अंतिम सामन्यात इंग्लंडकडून पराभव

हैदराबाद–वेगवान आणि आक्रमक सुरुवात केल्यानंतरही भारतीय महिला हॉकी संघाचा इंग्लंडच्या अचूक नियोजनबद्ध खेळापुढे निभाव लागला नाही. त्यामुळे विश्वचषक पात्रता हॉकी स्पर्धेत भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. शनिवारी झालेल्या अंतिम लढतीत इंग्लंडने भारतीय संघाचा २–० असा पराभव केला. मात्र, भारतीय महिला संघाने या वर्षी होर्णाया विश्वचषक हॉकी स्पर्धेसाठी पात्रता आधीच सिद्ध केली होती. जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर असलेल्या इंग्लंडला ग्रेस बाल्सडन हिने १३व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरद्वारे गोल करून आघाडीवर नेले. त्यानंतर ४३व्या मिनिटाला एलिझाबेथ नील हिने मैदानी गोल करत ही आघाडी दुप्पट केली. भारतीय संघाने पूर्ण ६० मिनिटे झुंज दिली, परंतु इंग्लंडचा भक्कम बचाव भेदण्यात त्यांना यश आले नाही.

## रोहित–विराट ओपनर, गिलचा पत्ता कट...

### वनडे वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाचा कॅप्टन कोण?

मुंबई–टीम इंडियाने २०२६ चा टी–२० वर्ल्ड कप सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात जिंकला. यानंतर आता टीम इंडिया आयसीसीची पुढची स्पर्धा २०२७ वनडे वर्ल्ड कपमध्ये खेळणार आहे. २०२७ चा वनडे वर्ल्ड कप दक्षिण आफ्रिकेमध्ये होणार आहे. या स्पर्धेसाठी बीसीसीआय, टीम मॅनेजमेंट आणि निवड समितीकडून आतापासूनच तयारीला सुरूवात झाली आहे.

शुभमन गिल हा भारताच्या वनडे आणि टेस्ट टीमचा कर्णधार आहे, पण टीम इंडियाच्या वनडे कॅप्टनलाच वनडे वर्ल्ड कपच्या टीममध्ये जागा मिळेल का नाही? याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे. वनडे वर्ल्ड कपमध्ये विराट कोहली–रोहित शर्मा ओपनिंगला तर ऋतुराज गायकवाड तिसऱ्या आणि श्रेयस अय्यर चौथ्या क्रमांकावर खेळतील, असा दावा टीम इंडियाचा माजी ऑफ स्पिनर आर.अश्विनने केला आहे, त्यामुळे अश्विनच्या टीममध्ये



कर्णधार शुभमन गिल यालाच जागा नाही.'तुम्ही २०२७ मध्ये वनडे वर्ल्ड कप खेळणार आहात. श्रेयस अय्यर चौथ्या क्रमांकावर खेळतो, पण मॅनेजमेंट ऋतुराज गायकवाडलाही संधी देऊ शकते. ओपन कोण करणार ते मला माहिती नाही, पण या परिस्थितीमध्ये विराट आणि रोहित ओपन करतील त्यानंतर ऋतुराज आणि मग श्रेयस', असं अश्विन म्हणाला आहे.शुभमन गिल हा भारताचा टेस्ट आणि वनडे टीमचा कर्णधार आहे, पण त्याला टी–२० टीममधून बाहेर करण्यात आलं आहे. गिलने भारताकडून ६१ वनडे खेळल्या आहेत, यात त्याने ५५ पेक्षा जास्तच्या सरासरीने आणि ९९.०२ च्या स्ट्राईक रेटने २,९५३ रन केल्या आहेत.

## पहिल्या सामन्यात कीवींचा दारुण पराभव

माउंट मौंगानुई–२०२६ च्या आयसीसी टी–२० विश्वचषक स्पर्धेनंतर, दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघ न्यूझीलंड दौऱ्यावर आहे, जिथं दोन्ही संघ पाच सामन्यांची रोमांचक टी–२० मालिका खेळत आहेत. मालिकेचा पहिला सामना आज, १५ मार्च रोजी माउंट मौंगानुई येथील बे ओव्हल इथं खेळला गेला. दक्षिण आफ्रिकेनं हा सामना एकतर्फी जिंकला. २०२६ च्या टी–२० विश्वचषक स्पर्धेत उपांत्य फेरीतील पराभवाचा बदला घेत पाहुण्या संघानं कीवीज संघाचा ७ विकेट्सनं पराभव केला. उपांत्य फेरीत आले होते आमनेसामने : हे लक्षात घ्यावं की आयसीसी टी–२० विश्वचषक २०२६ चा पहिला उपांत्य सामना ४ मार्च रोजी कोलकाता इथं न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळला गेला. न्यूझीलंडनं हा सामना ९ विकेट्सने जिंकला. मात्र, टी–२० मालिकेच्या पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचं पूर्णपणे वर्चस्व राहिलं.

न्यूझीलंडचा संघ ९१ धावांवर बाद : मालिकेच्या पहिल्या टी–२० मध्ये न्यूझीलंडचा कर्णधार मिशेल सँटनरनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. परंतु त्याचा निर्णय चुकीचा ठरला. कीवी संघ १४.३ षटकांत फक्त ९१ धावांवर बाद झाला. जेम्स नीशमनं सर्वाधिक २६ धावा केल्या. इतर कोणत्याही खेळाडूनं २० पेक्षा जास्त धावा केल्या नाहीत. दक्षिण आफ्रिकेकडून न्कोबानी मोकोएनानं सर्वाधिक बळी घेतले आणि सामनावीराचा पुरस्कार मिळवला. जेराल्ड कोएत्झी, ओटनील बार्टमन आणि कर्णधार केशव महाराज यांनी

## लैंगिक शोषणाच्या आरोपदरम्यान क्रिकेटर यश दयालने उरकलं लग्न! कोण आहे

मुंबई –रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा स्टार वेगवान गोलंदाज यश दयालबद्दल एक आश्चर्यकारक बातमी समोर येत आहे. त्याने गुपचूप लग्न केल्याचे वृत्त आहे. आयपीएल २०२६ २८ मार्च रोजी सुरू होणार आहे, परंतु दयालने त्यापूर्वीच लग्न केले आहे. दयालचे नाव गेल्या अनेक महिन्यांपासून वादात अडकले आहे. एका महिलेने त्याच्यावर लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक छळ केल्याचा आरोप केला होता. या सर्वामध्ये, आता क्रिकेटपटूने लग्न केल्याची बातमी समोर आली आहे.

यश दयालची पत्नी कोण आहे?

यश दयालने गुपचूप लग्न केले. त्याच्या पत्नीचे नाव श्वेता पुंदिर आहे. या जोडप्याचे लग्न एका खाजगी समारंभात झाले ज्यामध्ये फक्त त्याचे कुटुंब आणि काही जवळचे नातेवाईक उपस्थित होते. दयालने त्याच्या लग्नाची अधिकृतपणे पुष्टी केलेली नाही किंवा त्याने सोशल मीडियावर पोस्ट केलेली नाही. श्वेता पुंदिर सोशल मीडियावर बरीच सक्रिय आहे. श्वेता एक व्लॉगर आहे आणि अनेकदा माजी



क्रिकेटपटूंसोबत व्हिडिओ शेअर करते.दयाल आणि श्वेता यांचे लग्न कधी झाले? मीडिया रिपोर्ट्सनुसार, यश दयाल आणि श्वेता पुंदिर यांनी ४ फेब्रुवारी रोजी उत्तर प्रदेशातील नोएडा येथे लग्न केले. लग्न गुप्त ठेवण्यात आले होते. दयालने त्याच्या लग्नाला मित्रांना किंवा सहकारी क्रिकेटपटूंना आमंत्रित केले नव्हते. श्वेताने दयालला पाठिंबा दिला. यश दयाल काही काळापासून वादात अडकला होता. एका महिलेने लग्नाच्या बहाण्याने त्याच्यावर लैंगिक छळाचा आरोप केला होता आणि त्याच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला होता. जानेवारी २०२६ मध्ये राजस्थान उच्च न्यायालयाने दयालला मोठा दिलासा देत त्याला अटकपूर्व जामीन मंजूर केला. या सर्व काळात श्वेता पुंडीरने यश दयालला पाठिंबा दिला आणि त्याच्या कठीण काळात त्याच्या पाठीशी राहिली. शिवाय, श्वेताने सोशल मीडियावर दयालला न्याय देण्याची मागणी करणारी पोस्ट शेअर केली.श्वेता पुंडीर ही एक लोकप्रिय कंटेंट क्रिएटर, सोशल मीडिया इन्फ्लुएंसर आणि व्लॉगर आहे. अलीकडेच भारतीय क्रिकेटपटू यश दयाल याच्याशी झालेल्या विवाहामुळे ती विशेष चर्चेत आली आहे. श्वेता ही मूळची दिल्लीची आहे. तसेच तिने दिल्ली विद्यापीठाच्या हंसराज कॉलेजमधून आपले शिक्षण पूर्ण केले आहे. तसेच, तिने मनेहरू इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनियरिंगफमधूनही प्रशिक्षण घेतले आहे.

एका खाजगी समारंभात तिने रॉयल चॅलेंजर्स

# लॅपटॉप अन् टी२० वर्ल्डकप ट्रॉफी... मॉडेलकडे ट्रॉफी पोहचलीच कशी? चाहत्यांचा संताप

**नवी दिल्ली**–भारतीय संघाने एक महिना उत्तम क्रिकेट खेळून, कष्ट करुन मिळवलेली टी–२० वर्ल्डकप २०२६ ची ट्रॉफी सध्या वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. ८ मार्च रोजी भारताने सलग दुसऱ्यांदा टी–२० चं जेतेपद पटकावत नवीन इतिहास घडवला. त्यानंतर अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याने टी–२० वर्ल्डकप ट्रॉफीसोबत केलेलं फोटोशूट, ट्रॉफी अगदी बसमध्येही स्वत:जवळच ठेवण्यासारख्या माध्यमातून टीकेचा धनी ठरला. एकीकडून ही टीका होत असतानाच आता ही ट्रॉफी चक्क एका क्रिकेटरच्या कथित प्रेयसीच्या बेडरुममध्ये दिसून आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

कोण आहे ही तरुणी?


विशेष म्हणजे हा फोटो या तरुणीनेच पोस्ट केला असून फोटोमध्ये बेड, विस्कटलेली चादर आणि तरुणीच्या हातात टी–२० वर्ल्डकपची ट्रॉफी दिसत आहे. आता हा फोटो पोस्ट करणारी तरुणी कोण असा प्रश्न पडला असेल तर ही तरुणी भारताने वर्ल्डकप जिंकल्यानंतरही मैदानात दिसून आली होती. भारताचा स्फोटक फलंदाज ईशान किशनसोबत दिसलेल्या तरुणीनेच म्हणजेच मॉडेल अदिती हुंडिया! भारतीय पुरुष संघाने जिंकलेली ट्रॉफी आदितीच्या बेडरुमपर्यंत कशी पोहोचली यावरुन टीकेची झोड उठल्याचे दिसत आहे.

अदितीने भारताने वर्ल्डकप जिंकल्यानंतरचे काही फोटो आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन शेअर केले असून यामध्ये बेडवर लॅपटॉप ठेऊन केलेला व्हिडीओ कॉल, गोड पदार्थ, मिरर सेल्फी, टीम इंडियाच्या बसबाहेरची गर्दी अशा अनेक गोष्टींचे फोटो पोस्ट करण्यात आलेत. मात्र सर्वांचं लक्ष वेधलं आहे ते बेडरुममध्ये अदितीने वर्ल्डकपची ट्रॉफी हातात पकडून क्लिक केलेल्या फोटोची. अनेकांनी सोशल मीडियावरुन आदितीने इन्स्टाग्रामवरुन शेअर केलेला फोटो पोस्ट करत हाच सवाल विचारला आहे.

आधीच्या खेळाडूंना भान होते, आता तसे दिसत नाही

''नेमके काय सुरु आहे? आयसीसी पुरुषांच्या टी–२० वर्ल्डकपची ट्रॉफी रोज रात्री एखाद्याच्या बेडरुममध्ये दिसतेय. आता ही पोस्ट अदितीने शेअर केली आहे. इशान किशनची गर्लफ्रेंड आहे अदिती. खरं सांगायचं तर यापूर्वी भारताने अशाप्रकारे चषक





जिंकला होता तेव्हा आपल्याला अशा पोस्ट दिसल्या नव्हत्या. कादाचित तेव्हाच्या टीममध्ये असलेल्या वरिष्ठ खेळाडूंना हा क्षण कसे हाताळावेत याचं अधिक भान असेल. आता ही ट्रॉफी पण ट्रॉफी वाटत नाहीये. ही घरच्यांसाठी आणि सोशल मीडियावर पोस्ट करण्यासाठी दिलेली एखादी वस्तू वाटतेय,'' असं एकाने पोस्टमध्ये म्हटलं आहे.

अदिती आहे कोण?

मागील अनेक वर्षापासून ईशान किशन अदितीसोबत रिलेशनशीपमध्ये आहे. मात्र भारताने वर्ल्डकप जिंकल्यानंतर पहिल्यांदाच हे दोघे सार्वजनिकरित्या जगासमोर आल्याचं पाहायला मिळालं. अंतिम सामन्यामध्ये ईशानला पाठिंबा देण्यासाठी अदितीही मैदानावर हजर होती. त्यामुळेच भारताने टी–२० वर्ल्डकप जिंकल्यानंतर अदिती तिच्या बॉयफ्रेंडसोबत मैदानामध्ये रोमँटिक अंदाजामध्ये दिसून आली. हार्दिक आणि माहिका शर्माबरोबरच ईशान आणि अदितीच्या रोमान्सचे फोटोही सोशल मीडियावर व्हायरल झाले.

अदिती सध्या काय काम करते?

अदितीचा जन्म १५ जानेवारी १९९७ रोजी राजस्थानमधील जयपूरमध्ये झाला आहे. इंडिया इंटरनॅशनल स्कूल, जयपूर; सेंट झेवियर्स कॉलेज, जयपूर येथून अदितीने बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनची पदवी घेतली आहे. २०१६ साली ती एलिट मिस राजस्थान स्पर्धेत पहिली उपविजेती ठरली होती. त्यानंतर २०१७ मध्ये ती फेमिना मिस इंडिया राजस्थान विजेती आणि फेमिना मिस इंडिया फायनलिस्ट होती. ''मिस गेटअवे गॉडेस'' आणि ''मिस फॅशन आयकॉन'' पुरस्कार तिला मिळाले. नोव्हेंबर २०२१ अदितीने लेबल अदिती हुंडिया नावाचा महिलांच्या कपड्यांचा ब्रँड सुरू केला. केवळ ऑनलाइन माध्यमातून कपडे विकणाऱ्या या कंपनीची सुरुवातीला फक्त दोन लोकांसोबत केली होती. आज या ब्रँडचा टर्नओव्हर कोट्यवधी रुपयांचा आहे. अदिती या ब्रँडची क्रिएटिव्ह डायरेक्टर आहे. अदितीच्या आईचं नाव बबिता हुंडिया असून वडील ललित हुंडिया हे व्यवसायिक आहेत. तर भाऊ यश हुंडिया हा व्यवसायिक पायलट आहे. अदिती आणि ईशान या वर्षी लग्न करणार असल्याची जोरदार चर्चा आहे.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात योगदान द्या

## माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांचे प्रतिपादन

## काँग्रेस भवन येथे जिल्हा परिषद नवनिर्वाचित सदस्यांची बैठक

**लातूर/प्रतिनिधी :** सत्ता असो किंवा नसो काँग्रेस पक्षाने नेहमीच ग्रामीण भागाच्या विकासात योगदान दिले आहे. काँग्रेस पक्षाच्या या विचारधारेनुसार सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याची भूमिका पार पाडावी असे प्रतिपादन माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष श्री धिरज विलासरावजी देशमुख यांनी केले.

लातूर जिल्हा परिषद पदाधिकारी निवडीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस भवन येथे काँग्रेस पक्षाच्या जिल्हा परिषद नवनिर्वाचित सदस्यांची बैठक लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष, माजी आमदार धिरज विलासरावजी देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.





बैठकीस काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, प्रदेश सचिव कल्याण पाटील, गटनेत्या आशाताई भिसे, मुख्य प्रतोद सोनाली थोरमोटे, प्रतोद औदुंबर पांचाळ आदींची उपस्थिती होती.

धिरज विलासरावजी देशमुख म्हणाले, काँग्रेस हा नेहमीच शेतकरी, कामगार, युवक, महिला व सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार करणारा पक्ष असून स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत देशाच्या आणि राज्याच्या उभारणीत काँग्रेसचे योगदान महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. सत्ता असो किंवा नसो काँग्रेस कायम सर्वसामान्यांच्या हिताच्या बाजूने उभा आहे. ग्रामीण भागातील रस्ते, पथदिवे, पाणी पुरवठा, शिक्षण, आरोग्य, कृषी, क्रीडा, उद्योग, सहकार क्षेत्राच्या विकासात काँग्रेस पक्षाची भूमिका मोलाची राहिली आहे.

त्यामुळे नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जनतेने काँग्रेसला भरभरून मतदान केले.

सहकारमहर्षी, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्ष सर्वाधिक जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला. जनतेने भरघोस पाठिंबा, आशीर्वाद देत काँग्रेस पक्षावर व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी आपण सर्वांनी यापुढे प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे, असे धिरज विलासरावजी देशमुख यांनी सांगितले.

आगामी काळात जिल्हा परिषदेमार्फत जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांना गती देण्याबाबतही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

## डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या पुढाकारातून व साई फाउंडेशनच्या माध्यमातून भव्य आरोग्य शिबीर संपन्न

### शिबिरामुळे नागरिकात चैतन्याचे वातावरण




**लातूर/प्रतिनिधी :** डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली व साई फाउंडेशन च्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. साळे गल्ली येथील हनुमान मंदिरात प्रभाग क्रमांक सहाच्या विद्यमान नगरसेविका ज्योतीताई दीपक अवस्कार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या पुढाकारातून या शिबिरात सर्व रोग निदान शिबिर आयोजित करून नेत्र तपासणी,रक्त तपासणी, सर्वसाधारण आजारांची तपासणी, रक्तदाब व मधुमेह चाचणी,प्राथमिक उपचार आयुष्यमान भारत कार्ड तसेच आरोग्यविषयक सखोल मार्गदर्शन करण्यात आले.मुख्यमंत्री सहायता निधीची नागरिकांना माहिती देण्यात आली.या शिबिरासाठी गणेश जी गवारे, भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा उपाध्यक्षा मीनाताई गायकवाड, सिद्धेश्वर मंडळ अध्यक्ष सुरेश जाधव, शशिकांत बिराजदार, प्रसाद लोकरे हे आवर्जून उपस्थित होते. या शिबिराचा लाभ साळे गल्ली, शाहू चौक, मैसूर कॉलनी, मज्जित रोड, हत्ते कॉर्नर, भीम नगर या ठिकाणच्या नागरिकांनी घेतला. उदयगीरी लॉयन्स धर्मदाय नेत्र उदगीर,महानगर पालिका लातूर, न्यू विजन नर्सिंग स्कूल लातूर यांचे सहकार्य लाभले.या शिबिराला परिसरातील नागरिकांचा मोठा व उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे वाढत चाललेल्या आजारांच्या पार्श्वभूमीवर हे आरोग्य शिबीर नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले. समाजाच्या आरोग्याची जबाबदारी ओळखून राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

आयोजकांनी भविष्यातही अशा लोकहितकारी व लोक उपयोगी उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येत असल्याचे डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी सांगितले.

या शिबिराचा लाभ अनेक नागरिकांना झाला असून या शिबिरामुळे नागरिकात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

## विराट हिंदू संमेलनाने उपळा पंचक्रोशी एकत्र; धार्मिक उपक्रमांत नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग




**धाराशिव/प्रतिनिधी :** तालुक्यातील उपळा (मा.) येथे आयोजित विराट हिंदू संमेलनाला पंचक्रोशीतील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठी गर्दी केली. धार्मिक विधी, ग्रामदिंडी आणि हर घर भगवा उपक्रमांच्या माध्यमातून दिवसभर गावात एकात्मतेचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित हे विराट हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले होते.यात उपळा, शिंगोली, वरुडा, कुमाळवाडी व खताळवाडी या पंचक्रोशीतील नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग या वेळी दिसून आला. संमेलनाच्या निमित्ताने सकाळपासून विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महादेवाला गावातील विविध समाजघटकांतील २९ जोडप्यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. त्यानंतर काढण्यात आलेल्या ग्रामदिंडीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याच पार्श्वभूमीवर हर घर भगवा अभियान राबवून गावातील अनेक घरांवर भगवा ध्वज फडकविण्यात आला. सायंकाळी झालेल्या मुख्य संमेलनात सामाजिक समरसता मंचाचे क्षेत्र समन्वयक निलेश गद्रे यांनी हिंदूंनी जातीभेद बाजूला ठेवून संघटित राहण्याची गरज अधोरेखित केली. इतिहासात एकत्रित शक्तीचा अभाव असल्याने हिंदू समाजाला दीर्घकाळ गुलामगिरीचा सामना करावा लागल्याचे नमूद करत सामाजिक ऐक्य ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. तर वारकरी परंपरेतील प्रवचनकार ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज एकंबीकर यांनी वारकरी संप्रदायाने समाजात एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. विविध संतांनी धर्म व समाजरक्षणासाठी दिलेल्या त्यागाची उदाहरणे देत हिंदूंनी परस्परांतील भेद विसरून एकत्र राहावे, असे आवाहन त्यांनी केले. या संमेलनाच्या आयोजनासाठी हिंदू संमेलन समितीचे अध्यक्ष महेश पडवळ, सचिव डॉ कळमकर, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर घोगरे, कोषाध्यक्ष काका घोगरे, निखिल गाढवे (वरुडा), औदुंबर पडवळ (शिंगोली), प्रसाद रणखांब (कुमाळवाडी), तसेच समितीतील १५० कार्यकर्त्यांसह श्रीसिद्धेश्वर हिंदू संमेलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी पार पडल्याबद्दल आयोजकांनी नागरिकांचे आभार मानले.

## निर्भीड, विज्ञाननिष्ठ व विवेकशील समाज निर्माण व्हावा: प्रा.डॉ.दशरथ भिसे

**लातूर/प्रतिनिधी :** संपूर्ण जगामध्ये भारतीय लोकशाही सर्वपरिचित आहे. निर्भिड, विज्ञाननिष्ठ आणि विवेकशील समाज निर्माण झाल्यास देश सर्वांगीण विकास करू शकतो असे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा.डॉ.दशरथ भिसे यांनी केले.महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने आयोजित शाश्वत विकासाकरिता विशेष युवक शिबिरातील बौद्धिक सत्रात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यक्रमाधिकारी डॉ.मनोहर चपळे हे होते. तर विचारपीठावर सामाजिक कार्यकर्ते शरद झरे, कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे आणि प्रसिद्ध गायक उत्तम भुतके आदीची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. भिसे म्हणाले की, भारतीय समाज अनेक अनिष्ट रूढी, प्रथा ,परंपरा याच्या जोखडात सापडलेला आहे. आजच्या विज्ञान, माहिती, तंत्रज्ञान आणि ए आय जगात विज्ञाननिष्ठ समाजाची सर्वांगीण प्रगतीसाठी नितांत गरज आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील कार्यकारण भाव लक्षात आला की, समाज विवेकशील बनतो. अंधश्रद्धेमुळे शारीरिक, मानसिक, सामाजिक हानी समाजाची होते. अंधश्रद्धा विरोधी कायदा होऊनही अजून जादूटोणा, भूतबाधा, अंगात येणे, बुवाबाजी करणे हे प्रकार मोठ्या प्रमाणात आहेत. याविषयी व्यापक प्रमाणात लोकजागृती करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

## गॅस दरवाढ व एलपीजी सिलेंडरच्या तुटवड्याविरोधात लातूर तालुका काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन

**दरवाढ तात्काळ मागे घ्यावी व नागरिकांना गॅस सिलेंडर नियमित उपलब्ध करून द्यावा, काँग्रेसची मागणी**



**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र सरकारने केलेल्या गॅस दरवाढीच्या निषेधार्थ तसेच बाजारपेठेत निर्माण झालेल्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या कृत्रिम तुटवड्याविरोधात माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख साहेब यांच्या सुचनेनुसार लातूर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश बेद्रे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, केंद्र सरकारकडून वारंवार करण्यात येत असलेल्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान अधिकच कठीण झाले आहे. आधीच वाढत्या महागाईमुळे त्रस्त असलेल्या जनतेवर गॅस दरवाढीचा अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

तसेच सध्या बाजारपेठेत एलपीजी गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याचे दिसून येत असून अनेक ठिकाणी नागरिकांना वेळेवर गॅस सिलेंडर उपलब्ध होत नाही. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून सर्वसामान्य जनतेमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, बाजारपेठेत निर्माण झालेला गॅस सिलेंडरचा तुटवडा दूर करावा व नागरिकांना गॅस सिलेंडर सहज व नियमित उपलब्ध होईल यासाठी योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी महेश चव्हाण प्रताप पाटील, बादल शेख, रामानंद जाधव प्रताप खोसे जनक गायकवाड, नरेंद्र गायकवाड, अभिजित भिसे ज्ञानेश्वर लकडे धिरज भांबरे, विनोद विर, फरमान शेख, संजय चव्हाण, नाना कसबे, निलेश गायकवाड, बाळासाहेब देशमुख, सोरभ देशमुख, मेघराज पाटील, नितीन जाधव, नामदेव उफाडे, बाळासाहेब कदम, विरसेन भोसले राणीताई खोडसे रोहीनी शिंदे संतोष स्वामीयांच्यासह काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी मांडली आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संगणकाची भाषा

### महाराष्ट्र महाविद्यालयात बी.सी.ए. विभागाच्या वतीने भित्तिपत्रक स्पर्धा




**निलंगा/प्रतिनिधी :** येथील महाराष्ट्र महाविद्यालयात बी.सी.ए. विभागाच्या वतीने भित्तिपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संगणकाच्या क्षेत्रात आज नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. बदलत्या काळाप्रमाणे विद्यार्थ्यांनीही आपल्या ज्ञानात भर घालून बदलणे आवश्यक आहे. यासाठी बी.सी.ए. विभागाच्या वतीने भित्तिपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत , संगणकात वापरल्या जाणाऱ्या विविध भाषांसंदर्भात माहिती भित्तीपत्रकाच्या माध्यमातून दिली. परीक्षक म्हणून लातूरच्या बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयातील डॉ. सुशांत देशमुख, इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. अजित मुळजकर यांनी काम पाहिले. या स्पर्धेत खान फरियाफातिमा मैनोजोद्दीन यांनी प्रथम, सावंत संकेशी अंबादास यांनी द्वितीय, तर भोसले उदय शाम यांनी तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, उप प्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, बी.सी.ए. विभागाचे प्रमुख प्रा.रवींद्र मदरसे, बी.एससी. संगणक शास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. गिरीश पाटील, इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ.अजित मुळजकर व प्रमुख पाहुणे डॉ. सुशांत देशमुख यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. मयूर शिंदे, प्रा. धनराज किवडे, प्रा. सुरज सोमवंशी, प्रा. अनिता गिरी, प्रा. मनीषा वारद , श्री. सिद्धेश्वर कुंभार, अनुराधा बिराजदार यांनी कार्य केले.

## मुलींनी शिक्षण, आत्मविश्वास आणि स्वसंरक्षणाच्या बळावर आत्मनिर्भर व्हावे : मुख्याध्यापक अरुणा कांदे (मुंढे)

### जागतिक महिला दिनानिमित्त जयक्रांती महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी विशेष विस्तारित व्याख्यान

**लातूर/प्रतिनिधी :** येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समिती आणि स्त्रीशक्ती स्वयंसिद्धा समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:३० वा. जागतिक महिला दिनानिमित्त मुलींसाठी आत्मनिर्भरता, साक्षरता, व्यक्तिमत्व विकास, स्वसंरक्षण, संतुलित आहार आणि सुदृढ आरोग्य या विषयांवर विशेष विस्तारित व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून अनिता खडके, सहशिक्षिका, जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय भादा (ता. जि. लातूर) तसेच अरुणा कांदे (मुंढे), मुख्याध्यापक, दयानंद विद्यालय, कव्हा (ता. जि. लातूर) उपस्थित होत्या.

आपल्या मार्गदर्शनात प्रमुख पाहुण्या अनिता खडके यांनी मुलींनी शिक्षणासोबतच आत्मविश्वास आणि स्वसंरक्षणाचे महत्त्व ओळखणे आवश्यक असल्याचे सांगितले. आजच्या बदलत्या काळात मुलींनी विविध कौशल्ये आत्मसात करून स्वतः ला सक्षम बनवावे. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि आरोग्यदायी जीवनशैली यामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहते, असे त्यांनी स्पष्ट केले.

दुसऱ्या प्रमुख पाहुण्या अरुणा कांदे (मुंढे) यांनी आपल्या भाषणात महिलांच्या सशक्तीकरणासाठी शिक्षण आणि व्यक्तिमत्व विकास अत्यंत महत्त्वाचा असल्याचे नमूद केले. आत्मविश्वास, जिद्द आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या बळावर मुली समाजातील प्रत्येक क्षेत्रात यश संपादन करू शकतात, असे त्या म्हणाल्या. तसेच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेणे आणि स्वतःच्या अधिकारांविषयी जागरूक राहणेही तितकेच गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रीधर कोल्हे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महिला सशक्तीकरणासाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन असल्याचे सांगितले. मुलींनी ज्ञान, कौशल्य आणि संस्कार यांच्या बळावर स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करावे. महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.



यावेळी मंचावर सौ. अनुराधा घार, कोषाध्यक्ष भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर, सौ. छायाताई घार, मुख्याध्यापक दयानंद प्राथमिक विद्यालय, लातूर, डॉ. संगीता घार, स्टाफ सेक्रेटरी जयक्रांती महाविद्यालय, डॉ. माया सरवदे, अध्यक्ष महिला तक्रार निवारण समिती तसेच डॉ. गीता वाघमारे, समन्वयक स्त्रीशक्ती स्वयंसिद्धा यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. माया सरवदे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. समिना शेख व प्रा. प्रज्ञा स्वामी यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. सुमन सपाटे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## सार्वजनीक गुढी महोत्सवाच्या अध्यक्षपदी नगरसेवक विकास कांबळे तर स्वागताध्यक्षपदी अमोल गिते यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी :** लातूरच्या गंजगोलाईतील प्रथम मानाच्या सार्वजनीक गुढी महोत्सव समिती २०२६ च्या अध्यक्षपदी लातूरचे नगरसेवक तथा मनपा स्थाई समिती सदस्य विकास सतिशराव कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच स्वागताध्यक्षपदी अमोल गिते यांची निवड करण्यात आली आहे. सार्वजनिक गुढी महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांनी बालाजी गवळी यांच्या अध्यक्षतेत झालेल्या बैठकीत ही निवड जाहीर केली आहे. उर्वरीत कार्यकारीणी पुढील प्रमाणे : उपाध्यक्ष –संजय सोनकांबळे, कोषाध्यक्ष – रामेश्वर भराडीया, सचिव – नितिन पडिले, कार्यक्रम प्रमूख – रामभाऊ जवळगे, सहकोषाध्यक्ष – नारायण भूतडा, सदस्य – काकासाहेब घुटे, धनंजय पाटील, बालाजी नागरगोजे, रवि जाधव, सचिन गांगले आदी. या नूतन कार्यकारीणीचा सत्कार गुढी महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांच्या हस्ते करणात आला. सार्वजनिक गुढी महोत्सवाचे हे ३८ वे वर्ष आहे. यंदा गुढी पाडवा सण गुरुवार १९ मार्च रोजी साजरा करण्यात येणार असून त्यानिमित विविध सामितीचे गठण आणि सार्वजनीक उपक्रमांची माहिती देण्यात येईल असे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांनी यावेळी सांगीतले. नूतन कार्यकारीणीचे स्वागत विविध स्तरातून होत आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती लातूर येथील विकसित झालेल्या कामाची पाहणी करून उर्वरित कामांचा घेतला आढावा




**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दिनांक १४ मार्च रोजी दुपारी उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती लातूर येथिल विकसित झालेल्या कामाची पाहणी करून उर्वरित कामांचा आढावा घेतला तसेच अमोल रमेश बच्चेवार यांच्या अमोल उद्योग दुकानास भेट देऊन व्यापाऱ्यांशि संवाद साधला. यावेळी खासदार डॉक्टर शिवाजी काळगे महापौर जयश्री सोनकांबळे उपमहापौर एडवोकेट स्नेहल उटगे,लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे सचिव अरविंद पाटील मनपा गटनेते विजयकुमार साबदे ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख रमेश बच्चेवार, अमोल बच्चेवार अतिश बच्चेवार नगरसेवक गिरीश ब्याळे नगरसेविका मंजुषा अग्रवाल नगरसेवक अभिषेक पतंगे नगरसेवक मंगेश सोनकांबळे, बालाप्रसाद बिदादा सुधीर गोजमगुंडे भालचंद्र सोनकांबळे गट्टूशेठ अग्रवाल नितीन कलंत्री लालूशेठ कचोरिया,बी. एस.पवार, तुळशीराम गंभीरे प्रल्हाद सूरवसे, चंदूशेठ कचोरिया आनंद मालू श्रीकांत ठोंबरे सुधीर बोरुळे आबेद गोलंदाज परीक्षित देशपांडे,असलम बागवान आदिसह लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व संचालक काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी खरेदीदार आडते व्यापारी हमाल मापाडी गाडीवान बच्चेवार कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर कृषी उत्पन्न बाजार समिती ४९ हजार रुपये पर्यंत खर्च करू शकते गुजरातमध्ये सगळे अधिकार बाजार समितीला आहेत महाराष्ट्र शासनाच्या कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी आम्ही शासनाकडे प्रयत्न करू.बाजारात आवक कमी झालेली आहे त्याबाबत मार्केट कमिटीनेच निर्णय घ्यावा लागेल बाजार बंद होणे हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

याबाबत क ड क धोरण बाजार समितीने तयार केले पाहिजे शुल्लक कारणावरून बाजार बंद होता कामा नये यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते भाजीपाला बटाटा कांदा मार्केटच्या सोयी सुविधा विकसित आपण टप्प्याटप्प्याने करू वाहतुकीच्या कोंडीबाबतही मनपाने व्यापक बैठक घेतली आहे महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाच्या एकमेव महापौर जयश्री सोनकांबळे आहेत लातूर मनपाकडील सर्व कामे व्यापाऱ्यांची जलद गतीने होतील बाजारपेठ स्थलांतराचा प्रश्न

रेंगा ळला आहे उद्योग मंत्री याची मी भेट घेतली आहे पंधरा दिवसात याबाबत अंतिम निर्णय होईल असे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले की अमेरिकेच्या दबावाखाली जगात युद्ध सुरू आहे या युद्धा चे परिणाम जगावर होत आहेत गॅस पेट्रोल बाबत आव्हाने निर्माण होत आहेत महिनाभरापूर्वी ट्रम्प मोदी करार झाला आणि शेतमालाचे भाव पडले. याबाबत आंदोलने निर्माण करावी लागतील परदेशातून डाळी आता लातूरमध्ये आलेल्या आहेत अर्थव्यवस्था बिघडत चाललेली आहे अमेरिका सांगते की भारताने

पेट्रोल डिझेल कोणाकडून खरेदी करावे अमेरिकेच्या दबावाला काँग्रेसच सरकार यापूर्वी कधीही बळी पडल नाही असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश सूर्यवंशी यांनी केले.

# शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर यांचा राजमाता जिजामाता संकुलतर्फे सत्कार





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर : जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर यांचा राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

जिल्हा परिषद माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती यांनी नुकतीच स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. त्यामुळे उपशिक्षणाधिकारी पदावर कार्यरत असलेले संजय क्षीरसागर यांची शिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन शिक्षणाधिकारी क्षीरसागर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य जी. आर. मुंडे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे आदी उपस्थित होते.

# ग्रंथोत्सवामुळे वाचन संस्कृतीच्या संवर्धनास मदत –आमदार विक्रम काळे

## औसा येथे ग्रंथप्रेमींचा मोठा प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** ग्रंथ वाचनाने माणसाचे मस्तक समृद्ध होते आणि समृद्ध झालेले मस्तक कोणापुढेही सहज नतमस्तक होत नाही, हा महापुरुषांचा विचार आजच्या डिजिटल युगात रुजविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार विक्रम काळे यांनी केले. औसा येथील श्री मुक्तेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये आयोजित दोन दिवसीय लातूर जिल्हा ग्रंथोत्सव व ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे होते.

यावेळी व्यासपीठावर उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर, मराठवाडा साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष योगीराज माने, ग्रंथ मित्र राम मेकले, प्रभाकर कापसे, प्राचार्य एस. एम. जलसगरे, संजय सूर्यवंशी, प्रा. अंकुश नाडे, शिवलिंग औटी, रविअप्पा चट्टे आणि राजकुमार जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

युवा वर्गामध्ये वाचनाची ओढ निर्माण करण्यासाठी ग्रंथ प्रदर्शन आणि ग्रंथोत्सवासारखे उपक्रम महत्वपूर्ण ठरतात. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, यासाठी मराठवाड्यातील आपण सुमारे ३५० शाळा व महाविद्यालयांना प्रत्येकी ३६ हजार रुपयांची ग्रंथसंपदा उपलब्ध करून दिल्याचे आ. काळे यांनी सांगितले. तसेच वाचकांना दर्जेदार ग्रंथ वाचनासाठी उपलब्ध करून देवून सार्वजनिक वाचनालयांनी या वाचन चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

ग्रंथ हे भविष्याचे दिशादर्शक: प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे दरवर्षी वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये ग्रंथोत्सव आयोजित केल्यास सर्वसामान्य वाचकांना तालुक्याच्या ठिकाणी पुस्तके विकत घेण्याची संधी मिळते. ग्रंथोत्सवाला येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने येथील स्टॉलवरून किमान एक तरी पुस्तक विकत घेऊन जावे. ग्रंथ माणसाला प्रेरणा देतात, स्वाभिमानी बनवतात. जगभरातील अनेक महान व्यक्तींना ग्रंथांमुळे प्रेरणा मिळाली आणि त्यांच्या कार्याला ग्रंथांमुळेच दिशा मिळाली. ग्रंथ हे पिढ्यानपिढ्याचे ज्ञान जपून ठेवतात, भूतकाळ व वर्तमानकाळ समजावून सांगतात आणि भविष्याचा दिशादर्शक म्हणून काम करतात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी यावेळी केले.

ग्रंथ मानवी जीवनातील ताणतणाव दूर करतात. वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी सतत प्रयत्न होणे गरजेचे आहे. ज्ञान आपल्याला विवेकशील व सुसंस्कृत बनवते. ग्रंथ आणि ग्रंथालये हे ज्ञानाचे खरे भंडार आहेत. आजच्या डिजिटल काळातही ग्रंथांना पर्याय नाही. आजही ग्रंथ वाचनाची आवड जपणाऱ्यांची संख्या अधिक आहे, असे डॉ. रोडे यांनी सांगितले.'

उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांनी ग्रंथोत्सव आयोजनाचा हेतू स्पष्ट करताना वाचन चळवळीला चालना देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगितले. प्रारंभी जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी प्रास्ताविक केले. तसेच या दोन दिवसीय ग्रंथोत्सवात विविध प्रकाशकांचे स्टॉल, पुस्तक प्रदर्शन, चर्चासत्रे व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून, वाचकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सूत्रसंचालन पी. सी. पाटील यांनी केले, तर राजेंद्र कोरे यांनी आभार मानले.

ग्रंथोत्सवानिमित्त सकाळी ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. श्रीरंग गहिनीनाथ यांच्या हस्ते ग्रंथपूजन करून ग्रंथदिंडीला सुरुवात झाली. या ग्रंथदिंडीत वारकरी वेशभूषा केलेला विद्यार्थ्यांचा चमू , मुक्तेश्वर विद्यालय, आजीम हायस्कूल, वीरभद्रेश्वर विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी खासदार जे. एम. वाघमारे, माजी आमदार गंगाधर पटणे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**प्रत्येकाने वाचनाची आवड जोपासायला हवी : जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे**

औसा येथे आयोजित दोन दिवसीय लातूर ग्रंथोत्सवाला जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर–घुगे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी ग्रंथोत्सवातील विविध पुस्तक दालनांची पाहणी केली. तसेच वाचक, नागरिक तसेच ग्रंथप्रेमींशी संवाद साधला. आजच्या डिजिटल युगातही ग्रंथ वाचन हे माणसाच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे, ज्ञानार्जनाचे आणि मानसिक स्वास्थ्याचे सर्वोत्तम साधन आहे. प्रत्येक व्यक्तीने, विशेषतः युवा पिढीने वाचनाची आवड जोपासली पाहिजे. ग्रंथ वाचनामुळे माणूस विवेकशील, सुसंस्कृत आणि स्वावलंबी बनतो. ताणतणाव कमी होतो आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन विकसित होतो, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

ग्रंथोत्सवासारख्या उपक्रमांमुळे सर्वसामान्य नागरिकांना विविध विषयांवरील दर्जेदार पुस्तके एकाच ठिकाणी उपलब्ध होतात. नागरिकांनी ग्रंथ दालनाला भेट देऊन किमान एक तरी पुस्तक खरेदी करावे. वाचन हा छंद नव्हे तर जीवनाचा भाग बनवावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केल.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


## सामान्य

असून ताणतणाव
करतनाहीत मान्य
देत राही भरवसा
स्थिती ही सामान्य
घोटाळी पांढरे ढग
म्हणे पडेल पर्जन्य
भिऊनको पाठीशी
दावे प्रेमळसौजन्य
होई सारे ऑलवेल
पासबुकबाकीशून्य
सहायतेचे प्रतिक्षेत
दुबळेअसहाय दैन्य
भूक उद्याही असेलं
राखून ठेवावे धान्य
तिजोरी भलीखाली
बचती द्यावे प्राधान्य
रिकामे असता हात
महान दाता वदान्य
लढा स्थिती विरूद्ध
मनात उसळे चैतन्य
जगभर अ स्वस्थता
सर्वं हो छिन्नविछिन्न
कशी राहणार सांगा
आपली स्थितीभिन्न
एकजुटीच्यालढाईंत
मनांत नको मालिन्य
युध्दा विजय दाखवू
पवित्र संबंधअन्योन्य

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६

# जळकोट पंचायत समितीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्याकडून अभिनंदन



**लातूर/प्रतिनिधी :** दि. १५ मार्च

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज रविवार, दि. १५ मार्च रोजी बाभळगाव येथील आपल्या निवासस्थानी लातूर शहर व जिल्ह्यातील नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि काँग्रेस कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या.

यावेळी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी जळकोट पंचायत समितीच्या सभापतीपदी निवड झालेल्या सुनिता कोसंबे व उपसभापतीपदी निवड झालेले प्राचार्य माधव वाघमारे यांचे अभिनंदन केले. त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा देतानाच, जळकोट तालुक्यातील विकासकामांना गती देण्याबाबतही त्यांनी चर्चा केली.

या प्रसंगी लातूर महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष शीलाताई पाटील, जळकोट तालुका काँग्रेस अध्यक्ष मारुती पांडे, बाबुराव जाधव, नागेश्वरी केंद्रे, शांताताई अदावळे, धनराज पाटील, आशिष पाटील, संभाजी कोसंबे, मुकुंद पाटील, सचिन केंद्रे, रमणकुमार अदावळे, नूर पठाण, गिरीश अदावळे, चंद्रकांत वाघमारे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळपासूनच बाभळगाव येथील निवासस्थानी जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी आपल्या अडीअडचणी मांडल्या. आमदार देशमुख यांनी सर्वांचे म्हणणे ऐकून घेत संबंधितांना आवश्यक त्या सूचना केल्या.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात बी.एस्सी. व बी.सी.ए. अंतिम वर्ष विद्यार्थ्यांचा निरोप

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र व भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने बी.एस्सी. आणि बी.सी.ए. अंतिम वर्ष विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ एमसिव्हीसी सभागृह नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे हे होते. तर विचारमंचावर प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. राघवेंद्र अवस्थी, मुख्य समन्वयक डॉ. भास्कर नल्ला रेड्डी, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एम.बी.स्वामी, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.डी.बी.चाटे, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख, डॉ.व्ही.एन.वाघमारे, डॉ.जे.एच. देशमुख, प्रा.प्रमोद सराफे, प्रा.व्यंकटेश घुले, प्रा.अमित पवार, प्रा.पूजा मुंडे आणि डॉ. अविनाश हेडाव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. राघवेंद्र अवस्थी म्हणाले की, विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या बळावर यश संपादन करता येते. महाविद्यालयीन जीवन हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात मिळालेले शिक्षण, अनुभव आणि संस्कार यांच्या बळावर विद्यार्थ्यांनी पुढील आयुष्यात प्रामाणिकपणे परिश्रम करून यश संपादन करावे असे सांगून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.


निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.    मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२    आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६